## भूपाळी

### गुरुराज भूपाळी

उठावे उठावे गुरूराज स्वामी। असो दर्शना तिष्ठलो सर्व आम्ही ।
उठोनी त्वरे पाय दावी दयाळा । प्रभो दर्शनी सौख्य नामी जिवाला ।।
(वही १)

# भाग १ :– नमस्कार

## १) सूर्यनारायण

चंडांशू हा दीप्तिरूपे उदेला । मना प्रत्ययाचा रवी एक जाला ।
नको कल्पना तर्क काही मनाला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।१।।

मना प्रत्यया देव तो हाचि येई। असा देव ठावा न लोकत्रयाही ।
असा एकला एकचि एक जाला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।२।।

कुणी सांगती येशुलागी भजा रे । परी येशू हा कोणी पाही कसा रे ।
महंमद तसा बुद्ध हा काय ठेला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।३।।

कुणी सांगती देव हा अंतराळी । कुणी बोलती देव ठेला कपोळी ।
परी कोण रे सांग पाही तयाला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।४।।

कुणी सांगती देव व्यापी जगाला । परी नोळखी कोणीही त्या प्रभूला ।
स्तुतीपैल तो पूर्ण निःशब्द झाला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।५।।

निराकार आकारी कैं येई ठावा । कसे आळवावे हरी वासुदेवा ।
कशी कल्पना तृप्ति देई मनाला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।६।।

जरी मूर्ति केली तरी कल्पनेची । परी कल्पना पाहता ते फुकाची।
परी सूर्य हा पूर्ण आकारी आला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।७।।

मना वेदिचा धर्म हा थोर कैंचा । बहू मोल हा वाटला तो फुकाचा ।
जयाचा प्रभू दृष्टीसी दावियेला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।८।।

नसे निर्मियेला नसे ठेवियेला । निराकार आकारी सहजेचि आला ।
जया पाहता सौख्य वाटे जिवाला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।९।।

जगी रोकडा पूर्ण हा हिंदुधर्म । जया बोध हा आटवी रूप नाम।
जिवा संशयो सत्य सांडोनि गेला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।१०।।

चिदाचिदाआदि हा रे सुजाणा । जगी जीवनू पूर्ण हा या जिवांना ।
जगी व्यापुनि नामरूपीच ठेला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।११।।

जगी तोचि जाला जगासी पहाला । जीवा एक तो पूर्ण आधार जाला ।
प्रकाशवी बुद्धि करीता कृपेला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।१२।।

खपुष्प हा सर्व आभास सांडी । साक्षात् प्रभूचि जगी थोर गोडी ।
हरी राम हा कृष्णरूपासी आला । नमस्कार हा सूर्यनारायणाला ।।१३।। (वही २०)

## २) श्री समर्थ रामदासस्वामी

पिता पंत सूर्याजी राणू सुमाता । तया पोटी या जन्म श्रीरामभक्ता ।
महारुद्र हनुमान अवतीर्ण झाला । नमस्कार हा धन्य नारायणाला ।।१।।
रवीच्या कृपे जन्म नारायणाला । अवतारी जो धर्मसंरक्षणाला ।
पराक्रमी धर्मकाजी रिघाला । नमस्कार हा धन्य नारायणाला ।।२।।
मनस्वी तपस्वी भला ब्रह्मचारी । खरा कार्यकर्ता पहाता विचारी ।
शिवाजीसी जो थोर आधार झाला । नमस्कार हा धन्य नारायणाला ।।३।।
स्वराज्याची भिक्षा दिली रामदासा । शिवाजी गुरूभक्त तो धन्य कैसा ।
विरक्ती गुणे नाही स्वीकार केला । नमस्कार हा धन्य नारायणाला ।।४।।
स्वधर्माची जे रोवुनिया निशाणी । शिवाजीसी सांगे म्हणा राम वाणी ।
स्वचिन्हांकिता थोर कैवारी झाला । नमस्कार हा धन्य नारायणाला ।।५।।
मनाची शते ऐकवी जो जगाला । खरे सत्य ते दावी त्यांच्या मनाला ।
सुलोकी महाधर्म हा चेतवीला ।नमस्कार हा धन्य नारायणाला ।।६।।
खरा लोक जो जाहला थंड गोळा । तिथे स्वाभिमानासी या पेटवीला ।
स्वकार्यासी जो थोर प्रवृत्त झाला । नमस्कार हा धन्य नारायणाला ।।७।।
स्वधर्माभिमानी किती निर्मियेले । जगा बंड पाखंड ते पार केले ।
कसा सर्व आनंदी आनंद केला । नमस्कार हा धन्य नारायणाला ।।८।।

जये स्थापिले सत्य श्रीरामराज्या । जये चालविले स्वये रामकाजा ।
मना बोधूनी आत्मबोधे निवाला । नमस्कार हा धन्य नारायणाला ।।९।।
अनेकी मठी कार्य हे चालविले । सुयत्ने किती लोक हे मेळवीले ।
खरा एक कल्याण त्याते मिळाला । नमस्कार हा धन्य नारायणाला ।।१०।।
जया वोळला धन्य श्रीशंभुराजा[१] । तयाचे कृपे जो स्वये रामराजा ।
सदा ज्यामुखी एकची राममाळा । नमस्कार हा धन्य नारायणाला ।।११।।
जये ग्रंथरूपे जगी वास केला । सदानंद साम्राज्यी[२] आरूढ झाला ।
चिरंजीव जो सत्यची सत्य झाला । नमस्कार हा धन्य नारायणाला ।।१२।।
तुकाराम गाती जयांचे गुणाला । तये दासरामा आशिर्वाद केला ।
महाभवन संताग्रणी जो जहाला । नमस्कार हा धन्य नारायणाला ।।१३।।
(वही २०)(वही ४२)

## ३) चिमड संप्रदायातील सिद्ध आणि संत

### १) रेवणसिद्ध इत्यादि

वंदू रेवणसिद्ध शंभुस्वरुपी मरुळप्रभूसी पहा । वंदू श्रीगुरु काडसिद्ध मुनिते नारायणाते अहा ।
वंदू माऊली लक्ष्मी साधू प्रभुसी रामा हनुमंतजी । वंदू या रघुनाथ भक्त सदया (तैसेची) गोविंदजी ।।
(वही २२)

### (२)निंबरगीकर महाराज, निंबरगी.

(१)

स्वयेची आले तुकाराम वाणी । म्हणोनी तया नाम हे नीलवाणी ।
दिली दिव्य वाणी गुरूलिंगगीता । नमी राम हा श्रीगुरुलिंगनाथा ।। (साप्ताहिक तुतारी)

(२)

पाया कसा घातला साधनाचा । सुमार्ग हा दावियेला सुखाचा ।
साकारला ब्रह्मरुपी स्वतेजा । नमस्कार नारायणालागी माझा ।। (वही१२४)

(३)

चैतन्य हे जेथ साकार झाले । आयूवरी पूर्ण वास्तव्य केले ।
पाया कसा घातला पंथराजा । (नमस्कार नारायणालागी माझा) । (वही १२४)

१. पाठभेद :- रामराणा २. पाठभेद :- साम्राज्य

(४)

परब्रह्म हे चालते बोलते जे । निंबर्गीमाजी झळके स्वतेजे ।
कसा हा आला श्रीतुकारामराजा । नमस्कार नारायणालागी माझा ।।

(साधुमहाराज चिन्मययशोगाथा)

**(३) नागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर, निंबरगी**

नागाप्पाण्णा परम जगती पौत्र नारायणाचे । भाऊराये सकलही दिले ज्ञान त्यांनाची त्यांचे।
निंबरगीसी सुख उजळिले वैभवे पूर्ण साचे । रामे नमीले निजमनी रमुनी अंतरी पाय त्यांचे ।।

(नागाप्पाण्णा चरित्र)

**(४) रघुनाथप्रिय साधुमहाराज, चिमड**

(१)

रघुनाथप्रिय साधु महाराजे राजराज संतांचे ।
साष्टांग प्रणती त्या सद्गुरु दैवत करी सुपंथाचे ।। (वही ४२)

(२)

गुरुलिंगजंगम पदांबुजि जे निवाले । गुरुकृपे जे गुरूरूप झाले ।
कीर्ती अशी श्रीरघुनाथप्रियाची । वंदी सदा पाउले सद्गुरूंची । (वही ४२)

(३)

नारायणे देव जयासि केला । आणाविला (मिळाला जगी) सत्यची आत्मतेला ।
रघुनाथप्रिय सद्गुरु राजराजा। नमस्कार साष्टांग हा त्यासी माझा ।। (वही ४२)

(४)

गुरुलिंगजंगम पदांबुजि जे निवाले। (असे दैव) आजि कैंचे उदेले ।
परमार्थी जो धन्यचि राजराजा । नमस्कार त्या सद्गुरु साधुराजा ।। (वही ४२)

(५)

चिन्मय सुसांप्रदायी झाला जो राजराज गुरुदेव ।
रघुनाथप्रियसाधु वंद्य हा धन्यचि सगुण देव ।। (वही ४२)

(६)

गुरुंची कृपा ज्यावरी होय ऐसी । खरा देवचि आणिला स्थापनेसी।
प्रभू डोलविला गुरुलिंगराजा। नमस्कार हा साधुराजासी माझा ।।

(दासराम गौरव ग्रंथ)

(७)

धणी भक्तीचा पूर्णची निर्विकल्पा। भला ब्रह्मचारी परमार्थदीपा।
सदा साधनी सत्य रंगोनि गेला। नमस्कार माझा रघुनाथप्रियाला।। (वही ४२)

(८)

गुरुलिंगजंगम पदांबुजी जे निवाले। (महावैराग्य)अंगी कैचे उदेले।
परमार्थी जो धन्यचि राजराजा। नमस्कार त्या सद्गुरु साधुराजा।। (वही ४२)

**(५) रामचंद्रमहाराज यरगट्टीकर ऊर्फ चिमड महाराज**

महाविष्णु हे भूवरी सत्य आले। हनुमंतजी जाणुनी धन्य केले।
कशी ओळखी एकमेकांसी झाली। श्रीराम चरणी मम वृत्ति धाली।।
(साधुमहाराज चिन्मय यशोगाथा)

**(६) शिवरामबुवा ब्रम्हचारी, चिमड**

गुरुभक्त ज्ञानी भला ब्रह्मचारी। काळावरी मात चाले विचारी।
गुरू राम थोर कैवारी झाला। नमस्कार हा धन्य शिवरामप्रभूला।। (वही २०)

**(७) व्यं. रा. ऊर्फ बाबासाहेब मुजुमदार, सांगली**

(१)

गुरूपादनिष्ठा परीपूर्ण ज्याची। पुजा करी नित्य श्रीसद्गुरूची।
सदा चिंती जो चित्ति या श्रीपरेशा। नमस्कार त्या धन्य व्यंकटेशा।। (वही २०,वही १०२)

(२)

गुरूपाद पूजा असे नेम ज्याचा। जणू ओतिला रामप्रभू कृपेचा।
विद्वन्मणी थोर भक्तीही सहजा। नमस्कार हा व्यंकटेशासी माझा।। (वही २०,१०२)

**(८) डॉ. विष्णुपंत आपटे, कोल्हापूर**

गुरुभक्त जे श्रेष्ठ होवोनि गेले। स्वरूपानुसंधी सगुणीच खेळे।
गुरू डोलवीला प्रभु रामराजा। नमस्कार त्या विष्णुपंतासी माझा।।
(साधुराजमहाराज चिन्मययशोगाथा)

**(९) सीता रामचंद्र यरगट्टीकर ऊर्फ माईसाहेब यरगट्टीकर, चिमड**

गुरू संप्रदायासी जी धन्य माता। जगी धन्य सीता पहा राम-कांता।
गुरूनामी आल्या तदाकारतेला। नमस्कार साष्टांग त्या माऊलीला।। (वही २०)

**(१०) दाजीसाहेब यरगट्टीकर,चिमड**

पहा दाजिबा सूत रामप्रभूचे। कृपाछत्र त्यांचेवरी सद्गुरूचे।
मनी आठवी श्रीगुरुराज याला। नमस्कार साष्टांग माझा तयाला।। (वही २०)

**(११) जानकीबाई यरगट्टीकर, चिमड**

(दाजीसाहेब यरगट्टीकरांची पत्नी)

हनूमत्सुता जानकी धन्य लोकी। पती दाजिबा थोर योगी विलोकी।
जया सासरे लाभले रामचंद्र। नमस्कार त्या होऊनिया विनम्र।। (वही २०)

**(१२) नारायणमहाराज यरगट्टीकर, चिमड**

जया श्रीगुरु श्रीबळवंत झाले। म्हणोनी तपस्ये बळवंत धाले।
चिमडासी शोभे परमार्थराजा। नारायणासी प्रणिपात माझा।। (वही ५०)

**(१३) गोविंदपंत घोसरवाडकर, घोसरवाड**

हालसिद्धनामे हृदयी निवाला। नारायणी पूर्ण रंगोनि गेला।
भजनामृते जो स्वयमेव धाला। नमस्कार गोविंदप्रभूराजयाला।। (सिद्धस्तुति)

**(१४) उद्धवरावजी यरगट्टीकर, चिमड**

नमो उध्दवाते बहू आदराने। जया भूतळी पाठवीले प्रभूने।
महाभक्त मच्छेंद्र योगीच वाटे। जया पाहूनिया मनी प्रेम दाटे।। (वही २०)

**(१५) भालचंद्र उद्धव यरगट्टीकर**

भालचंद्र गमला गुणमेरु। बालभक्त जहाला अधिकारु।
शीघ्रबुद्धि विलसे कशी भारु। आदरे प्रणती त्या अरुवारु।। (वही१४)

**(१६) राजकवि गो.गो. मुजुमदार ऊर्फ साधुदास, सांगली**

हनुमंतचरित्रा बहु आदराने। गावोनिया धन्य झाला कृतीने।
गुरुपायी गोपाळ करितो स्तुतीला। नमस्कार हा प्रेमभावे तयाला।। (वही २०)

**(१७) नारायण श्रीपाद ऊर्फ नानबा फडणीस, सांगली**

(१)

कल्याण जै रामदासप्रभूचे। तसेच जे श्रीहनुमद्‌गुरूचे।
मनी आळवी जो गुरुराज यांना। नमस्कार त्या धन्य नारायणांना।। (वही २०)

(२)

कल्याण जैसे शिवराज गुरूंचे। तैसेच जे श्रीहनुमंत प्रभूंचे।
मनी आठवी श्रीगुरुराजयाला। नमस्कार त्या भक्त नारायणाला।। (वही २८)

**(१८) गंगाधरराव सिंग दीक्षित**

हनुमंत सेवा अनुदिन केली। हनुमंत छाया जयासी जहाली।
असा श्रेष्ठ तो पाहता भक्तराजा। नमस्कार गंगाधरालागी माझा।। (सांगली माहात्म्य)

## ४) इंचगेरी संप्रदायातील संत

### १) भाऊसाहेब महाराज उमदीकर, उमदी

(१)

सदा साधनी नेम अपूर्व ज्यांचा। गुरुनामीया रंगली नित्य वाचा।
तपोमूर्ती हा संत श्रीभाऊराजा। नमस्कार हा त्याप्रती जाण माझा।।
(साधुमहाराज चिन्मययशोगाथा)

(२)

जया लाभले सद्गुरु साधुराय। सदा सेवी सानंद ते धन्य पाय।
अशा भाऊराये गुरु डोलवीला। नमस्कार हा थोर त्यांचे पदाला।। (वही २०)

### (२) ह.भ.प.प्रा.डॉ.रा.द.रानडे,निंबाळ

कसा तेवतो ज्ञान भक्ती प्रदीप। सुमार्गी जनी साधुसंती अधीप।
असे थोर विद्वन्मणी रामचंद्र। महाभूषणा वंदू होवोनि नम्र।। (वही २०)

## ५) समर्थ रामदासांशी संबंधित सत्पुरुष

### (१) कल्याणस्वामी

विरक्ताग्रणी सद्गुरु रामदासा। जये सद्गुरु मोहिले शिष्य ऐसा।
दुजा ना जगी एकला धन्य झाला। नमस्कार कल्याण-पादांबुजाला।। (वही २०)

### (२) रघुनाथस्वामी, ब्रह्मनाळकर

सदा शांत मूर्ती अशी ज्यांची कीर्ती। जगी जाहले थोर संत विभूती।
(सुभीमासी?)दावी गुरुराज भोळा। नमस्कार रघुनाथस्वामी प्रभूला।। (वही २०)

### (३) समर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देव, धुळे

जये................स्वामी समर्था। अहा अर्पिले साधूनी शांत.......।
गुरु रामदासांतरा जो मिळाला। नमस्कार साष्टांग त्या शंकराला।। (वही २०)

### (४) ह.भ.प.ल.रा. पांगारकर, पुणे

सन्मान्य साधूवचनी ..... निवांत। संसारी षड्वैरी करतील मात।
अशा कारणे नित्य अभ्यास केला। नमस्कार त्या श्रेष्ठ लक्ष्मणाला।। (वही २०)

## (६) वारकरी संप्रदायातील संत

### (१) नामदेव महाराज, पंढरपूर

महाबद्ध लोका निजानुग्रहाने। भवांबुधी पैल नेई कृपेने।
अंकीत केले हरी वासुदेवा। नमस्कार त्या धन्य श्रीनामदेवा।। (वही २०)

### (२) गोरा कुंभार

कुलाल वंशात ज्या जन्म झाला। हरीनामी या पूर्ण रंगोनि गेला।
भक्ताग्रणी जो स्वयमेव रमला। नमस्कार साष्टांग गोरा पदाला।। (वही २०)

### (३) ह.भ.प. धुंडामहाराज, देगलूर

जन्मोनी साधूकुळी साधु झाला। हरीनामी आला तदाकारतेला।
गळा घातली श्रीप्रभुनाम माला। नमस्कार त्या धन्य धुंडापदाला।। (वही २०)

### (४) ह.भ.प. विष्णुबुवा जोग, पुणे

कशी बाणली पूर्ण अंगी विरक्ती। खरा ब्रह्मचारी समाधान मूर्ती।
ज्ञानेश्वरी अंतरंगा मिळाला। नमस्कार त्या धन्य विष्णुपदाला।। (वही २०)

### (५) ह.भ.प. शंकर वामन ऊर्फ मामासाहेब दांडेकर, पुणे

परीपूर्ण ज्ञानी खरा ब्रह्मचारी। तत्त्वज्ञ जो माळधारी विचारी।
हरीनाम रंगी तदाकार झाला। नमस्कार त्या धन्य श्रीशंकराला।। (वही २०)

## (७) इतर साधुसंत

### १)नामधारक

सदा संगती नाम आसे जयाच्या। सदा रामनामे वदे ज्याची वाचा।
सद्गुरुकृपे हा लाभ जयासी झाला। नमस्कार साष्टांग माझा तयाला।। (वही १)

### २) हालसिद्धनाथ

चरणांबुजी वाहते दूधगंगा। कशी साक्ष ही दाविली अंतरंगा।
सावित्रीसाठी अवतार झाला। नमस्कार श्रीहालसिद्धा पदाला।। (वही १२४)
स्वये धावला वो जिथे दूधगंगा। जगा दाविली साक्ष ये अंतरंगा।
अवतार हा थोर सद्भक्ति काजा। नमस्कार श्रीहालसिद्धासी माझा।। (वही १२४)

### ३) दिगंबर महाराज

दिगंबर साकारची जन्म झाला। प्रभाकरे मस्तकी हस्त ठेला।
प्रभाकर नामेचि जो सिद्धराजा। दिगंबरासी प्रणिपात माझा।। (वही १११)

### ४) वजीरबाबा, औरवाड

अवलिया असा औरवाडासी झाला। असे बोलणे सत्य दिसे जगाला।
परीपूर्णचि संत विदेही राजा। वजीरबाबासी प्रणिपात माझा।। (वही १३८)

**५) सिद्धारुढ स्वामी, हुबळी**

गुरुनामि या ऐक्य झाले जयांचे। कृपाछत्र ज्या पूर्ण सिद्धेश्वरांचे।
शंभूपदी शंभूरुपे मिळाला। नमस्कार सिद्धारुढ राजयाला।। (वही २०)

**६) राधाबाईअक्का, हरिपूर**

कशी जाहली कृष्णस्वरुप राधा। जिचे नाव घेता तुटे देह बाधा।
भजनामृते पूर्ण होवोनि ठेल्या। नमस्कार हा भक्तिभावे पदाला।।
(राधाबाईअक्का यांचे चरित्र)

**७) माणिकप्रभू, हुमणाबाद**

महाराज योगी खरा वीतरागी। परब्रह्मी आनंद साम्राज्य भोगी।
हरी सावळा घालि ज्या दिव्य माळा। नमस्कार त्या धन्य माणिकप्रभूला।। (वही २०)

**८) सोहिरोबानाथ अंबिये**

विराजती सिद्धपदी सुतेजे। संताग्रणी श्रीगुरुराज राजे।
सदा ध्याई जो गहनीप्रभूला। नमस्कार त्या सोहिरोबा पदाला।। (वही २०)

**९) ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, गोंदवले**

महाराष्ट्री या माणगंगा तीराते। असे गाव गोंदावले क्षेत्र तेथे।
यजुर्वेदी विप्रगृही जन्म घेती। नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती।। (वही २०)

**१०) निरंजन रघुनाथ स्वामी**

कैवारी ज्याचा गुरुदत्त भोळा। प्रभू दत्त भेटी कृतकृत्य झाला।
गुरुनामी जो पूर्ण रंगोनि गेला। नमो निरंजन रघुनाथ बोला।। (वही २०)

**११) नृसिंहसरस्वती, आळंदी**

अलंकापुरी वासी होत जो ठेला। जगी धन्य जो परब्रह्मी धाला।
नि:संग तो अंतरी या मिळाला। नमस्कार नृसिंहसरस्वतीला।। (वही २०)

**१२) वामनराव गुळवणीमहाराज, पुणे**

स्वये कसे दत्तगुरुचि जहाले। टेंबे गुरूपायी कई स्थीर झाले।
जया शक्तिपाता अधिकार आला। नमस्कार माझा तया वामनाला।। (महानिर्वाण)

**१३) दादाभाई टाकीमहाराज, जोगेश्वरी**

सद्भक्तीची करणी करुनी तारण्या बद्ध लोका। आला जो का गुरुखुणा सुखा दावण्या मृत्युलोका।
भाई जो परि जो(?) रमुनि विलसे रंगी श्रीरामनामा। दादाभाई नमन तव असो चित्ती या पादपद्मा।।
(वही २०)

### १४) शंकरमहाराज शिपुरकर

हालसिद्धनाथा आळवी (जो) समर्था। नुरली जयासी कसलीच चिंता।
असा जाहला श्रेष्ठ तो भक्तराजा। नमस्कार हा शंकरालागी माझा।। (वही १३४)

### १५) नीलकंठ भारती, सातारा

शिवाचे पदी जो नीळकंठ जाहला। नीलकंठ नामे तयालागी बोला।
घनश्याम श्रीराम कंठी विराजे। नमूया असे श्रीनीलकंठ राजे।।१ ।।

वाडी अशी विठ्ठलांची न कोठे। जये ठायी जाता परब्रह्म भेटे।
महाराज तो श्रीनीलकंठ राजा। नमस्कार सप्रेम हा त्यासी माझा।।२।।

नीळकंठ जेथे तिथे पुण्यक्षेत्र। सदा दर्शने भक्त होती पवित्र।
आशिर्वादची देतसे भाविकांना। नमस्कार हा श्रीनीलकंठ राणा।।३।।

कुणा दिले जीवन अन्नदान। कुणा संकटी होत असे प्रसन्न।
अती कष्ट घेवोनि सन्मार्ग दावी। श्रीनीलकंठ तो साक्षची हे प्रभावी।।४।।

महामंत्र जो देतसे भाविकांना। अंतर्खुणे मार्ग दावी पहाना।
असा श्रेष्ठ जो का जगी सिद्धराजा। नमस्कार माझा श्रीनीलकंठराजा।।५।।

(नीलकंठभारती चरित्र)

### १६) रामचंद्रमहाराज तिकोटेकर

सदा साधनी थोर नीमग्न झाले। सदैव सेवा घडली जयाला।
खरा ब्रह्मचारी असे संतराजा। नमस्कार हा रामंचद्रासी माझा।। (वही १२४)

### १७) पांडुरंगमहाराज ताम्हनकर, सांगली

भजनी सदा पूर्ण रंगोनि गेले। स्वये पाहता पाहता पंत झाले।
कसा साधनी मग्न हा संतराजा। नमस्कार श्रीपांडुरंगासी माझा।। (सांगली माहात्म्य)

### १८) यशवंतराव कर्णेकर, सांगली

जया लाभले श्रीगुरू पांडुरंग। भजनी जया लाभले सत्य अंग।
असा जो जगी पाहता भक्तराजा। नमस्कार हा श्रीयशवंतराजा।। (सांगली माहात्म्य)

### १९) तात्यामहाराज तेली, शिरोळ

शिरोळ ग्रामी अवतार झाला। सहजेचि येथे घडे भक्तिलीला।
महाराज तात्या प्रभू दत्त राजा। नमस्कार हा प्रेमभावेचि माझा।। (वही १५८)

## ८) कोटणीसकुळातील संतसज्जन

**(१) वामन नरसिंह कोटणीस (वामनकाका कोटणीस),मुधोळ**

(ह.पां.उर्फ तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे चुलते)

जया सद्‌गुरु लाभला रामराणा। परीपूर्णता साध्य साधोनी यत्ना।
अखंडीत विश्राम नामी जयाला। नमस्कार साष्टांग त्या वामनाला।। (वही २०)

**(२) गोपाळ वामन कोटणीस (गोपाळकाका कोटणीस),चिमड**

(वामनकाका कोटणीसांचे चिरंजीव)

करी साधने साध्य साधोनि यत्ना। मनी डोलवीला श्रीगुरुरामराणा।
हरि कीर्तनी रंगली ज्यांची काया। नमस्कार साष्टांग गोपाळराया।। (वही २०)

**(३) बहिणाबाई कोटणीस, सांगली**

(ह.पां.कोटणीसमहाराजांच्या मातोश्री)

हरी नामी ज्या पूर्ण रंगोनि गेल्या। स्वरूपी रुपाकार होऊनि ठेल्या।
हनूमंत ज्यांच्या उदरासी आला। नमस्कार बहिणा गुरुमाऊलीला।। (वही २०)

**(४) हणमंत पांडुरंग ऊर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज, सांगली**

(१)

होता संग्रह पुण्यरूप पहिला श्रीसद्‌गुरु भेटला। ज्याने अज्ञ जनासी पार तरण्या सन्मार्ग तो दाविला।
केले पूर्ण मनोरथा झिजवुनी देहासी कष्टे पहा। त्या श्रीमद् हनुमंत सद्‌गुरु पदी माझा नमस्कार हा।।
(वही २०)

(२)

हनुमंत अवतार हनुमंत भारी। मनी आठवी राहुनी ब्रह्मचारी।
गुरु स्थापिला श्रीहनुमंत कैचा। वंदू हनुमंत गुरुभक्त साचा।। (वही १)

(३)

श्रीरामपाया मनी लीन झाले। गुरु भक्तीचा कळस अखंड डोले।
हरी कीर्तनी रंगला संतराजा। हनूमत्प्रभूसी नमस्कार माझा।। (वही १)

(४)

जयामुळे सांगली क्षेत्र झाले। हरीनाम संकीर्तन नित्य चाले।
असा श्रेष्ठ तो श्रीहनुमंतराजा। नमस्कार साष्टांग हा त्यासी माझा।।
(साधुमहाराज चिन्मय यशोगाथा)

**५) लक्ष्मी व रघुनाथ (तात्यासाहेब कोटणीसमहाराजांची पत्नी व पुत्र)**

विराजती श्रीहनुमत्प्रभू हे। लक्ष्मी गुरूराज पत्नी ही पाहे।
करी घेतले श्रीरघुनाथ यांना। नमस्कार साष्टांग माझा तयांना।। (वही २०)

**६) रघुनाथ हनुमंत ऊर्फ बाबूराव कोटणीसमहाराज**

(तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे चिरंजीव)

(१)

कैवल्यधामी त्रयमूर्ती स्थानी। उपासना चालवीली जयांनी।
पिता सद्गुरु ज्या हनूमंतराजा। रघूनाथजीते नमस्कार माझा।। (दासराम गौरव ग्रंथ)

(२)

भक्त श्रीरघुनाथजी हरिचिया संकीर्तनी रंगले। साधूच्या वचनामृता झणी स्वये हृद्मंदिरी ठेविले।
सप्रेमे हनुमंत संत पितया चित्तास संतोषी ते। सेवेसी रतले अहर्निश भले झाले आम्हालागी ते।।
(वही २०)

**र.ह.कोटणीस यांचेवरील नमनाष्टक**

(१)

श्रीलक्ष्मी अक्का परिपूर्ण वचनी। साधुकृपे श्रीहनुमंत सदनी।
लक्ष्मीचिया पोटी जन्मासी आला। नमस्कार हा श्रीरघुनाथ याला।।१।।

(२)

तुम्हाला तरी गाठले फेफऱ्याने। हनुमत्कृपे ते पळालेचि भेणे।
अत्यल्प असताचि हा खेळ केला। नमस्कार हा श्रीरघुनाथ याला।।२।।

(३)

अनुग्रहो श्रीहनुमत्प्रभूंचा। पाठीवरी हात सदैव त्यांचा।
तुम्ही असे लाडके पुत्र झाला। नमस्कार हा श्रीरघुनाथ याला।।३।।

(४)

कैवल्यधामासी भाकित केले। तेचि तुवा साच करोनि ठेले।
त्रैमूर्तीचा वास इथेचि झाला। नमस्कार हा रघुनाथ याला।।४।।

प्रतीपाळी ग्रंथालय बाबुराव। बोलोनी गेला श्रीहनुमंतराव।
मनोरथ हा पूर्ण तुम्हीच केला। नमस्कार हा रघुनाथ याला।।५।।

संताचिया वस्तु ठेल्या जपोनी। प्राणचिया पैल सदैव ध्यानी।
असा संग्रहो नाहीच देखियेला। नमस्कार हा रघुनाथ याला।।६।।

गुरूभक्त साधूची झाली प्रभाच। असे दाविले सर्व जगासी साच।
पहाता तरी नाहीच तूळणेला। नमस्कार हा श्रीरघुनाथ याला।।७।।
हरीनाम संकीर्तन चालविले। किती सभारंभ सोहळेचि झाले।
हनुमंतपायीच विश्रांति आला। नमस्कार हा रघुनाथ याला।।८।।

(वही १०३)

**(७) र.ह.कोटणीस यांच्या ''कैवल्यप्रसाद'' ग्रंथाचे अर्पणपत्रिकेचे श्लोक**

(१)

भक्त श्रीरघुनाथ धन्य सुपिता पावे 'प्रसादू' मना। सद्गुरु हनुमंत संत विभवे पुरवी मनोभावना।
कैवल्यालयी पुष्पवेल फुलला घेवोनी पुष्पे बरी। अर्पी श्रीरघुनाथ नित्य सुमने श्रीपादपद्मावरी।।१।।

(२)

वडिलांची उपरीच सत्कृति आम्ही अर्पू हनमत्पदा। जे का चिंतून राहता आमुते आनंद देई सदा।
पुष्पातील सुगंध नित्य पसरो आमुच्या मनी भाव हा। आशीर्वादचि लाभ थोर बरवा वाटे आम्हासी महा।।२।।

**(८) सौ.जानकीबाई कोटणीस,सांगली**

(र.ह.कोटणीस यांच्या पत्नी)

(१)

कैवल्यधामी रघुनाथ राजा। गुरूपुत्र द्वारी हनूमंतकाजा।
सवे जानकी शोभते माय शीला। नमस्कार साष्टांग त्यांचे पदाला।।

(वही २०)

(२)

माता जानकी लक्ष्मी जी घरचि या धर्मासी जी जागली। स्वार्थत्यागी बहूत निष्कपट जी सत्यासी संतोषली।
भक्तीप्रेमभरे सुशांत अशी जी संकीर्तनी रंगली। गेलीसे पतिधर्मतत्पर खरी कैलासलोकी भली।।

(वही २०)

**(९) डॉ.गोविंद हणमंत कोटणीस, सांगली**

(र.ह.कोटणीस यांचे बंधु)

हनुमत्पुत्रा जगती तव या गाजविले संप्रदाया। वंद्यामाजी .....गुणांनी(?) तोषविले ही भूया।
गुरुभक्तीया कुलदिप गुणे साध्य साधी अमूपा। गोविंदाते नमन करितो कोटणीसा प्रदीपा।।

(वही २०)

## ९) केळकर कुळातील संतसत्पुरुष

### (१) गोविंद अनंत ऊर्फ मामामहाराज केळकर

(१)

हरिकीर्तनी रंगली वृत्ति ज्यांची। मनी मूर्ती जे ध्याती रामप्रभूची।
गुरु डोलवीला हनूमंत राजा। नमस्कार गोविंदरायासी माझा।। (महानिर्वाण)(वही ५०)

(२)

निळोबापरी बाणली वृत्ति ज्यांची। तदाकारता श्रीहरिकीर्तनाची।
जया वोळला श्रीहनुमंत राजा। नमस्कार गोविंदरायासी माझा।। (वही ५२)

(३)

हनूमंत आदेश प्राणासमान। गोविंद नेमे करी नामकीर्तन।
सेवा घडे सेवक बुद्‌धीने ही। पदांबुजी बालक राम राही।। (वही ५२)

(४)

सदा कीर्तनी रंगली वृत्ति ज्यांची। मनी मूर्ति जे ध्याती रामप्रभूची।
गुरू डोलवीला हनूमंतराजा। नमस्कार गोविंदरायासी माझा।। (वही ४२)

(५)

हरीकीर्तनाकारणे जन्म झाला। हरी कीर्तनी साच अखंड ठेला।
हरी कीर्तनानुग्रहो सत्प्रचीती। नमो कीर्तनानंद गोविंद चित्ती।। (वही ५०)

(६)

डोले कसा कळस हा भक्तिभावे। हरी भक्ती जैं दाखविली प्रभावे।
गुरू डोलवीला हनूमंतराजा। नमस्कार गोविंदरायासी माझा।। (वही १२४)

(७)

जया जाहले दर्शन ज्ञानियांचे। स्वये काढिले चित्र तसेचि त्यांचे।
असे भक्त[१] गोविंदजी पूर्ण काम। चरणांबुजा वंदीत दासराम।। (वही ११५)

(८)

जये क्षात्रतेजासी दिला उजाळा। रणांगणी मान सन्मान जहाला।
सदा चिंतिती ज्ञानदेवी स्वकाजा। नमस्कार गोविंदरायासी माझा।। (वही ११५)

(९)

समाधी स्थिती रंगुनी रामनामी। गोंविद मिनले गुरुलिंग धामी।
आली अशी आजी गोंविदनवमी। मनी वंदिली पाऊले दासरामी।। (वही ११०)

---

१.पाठभेद :- महाभक्त

**(२) नारायणमहाराज यरगट्टीकर आणि मामामहाराज केळकर**

गुरुभक्त नारायण बापूराव। श्रीरामद्वारी विलसे अपूर्व।
सद्भक्तीया वेचिती आयु काजी। नमस्कार गोविंद नारायाणाजी।।

(साधुमहाराज चिन्मय यशोगाथा)

**(३) सौ. इंदिराबाई केळकर (मामामहाराज केळकरांच्या पत्नी)**

नमो इंदिरा माऊली शांतमूर्ती। हनूमत्कृपे अंतरी थोर भक्ती।
ध्यानी मनी एक गोंविद चित्ती। पदांबुजी अर्पिली प्राणज्योती।।

(नमनस्तोत्र)

**(४) राम गोविंद उर्फ दासराममहाराज केळकर**

वजीरबाबा कृपे जन्म झाला। हनूमत्प्रभूचा शिरी हात आला।
गुरुलिंगनाथे निज बोध केला। हालसिद्धपायी असा राम धाला।।

(वही १३८)

***

# भाग २ – संतगौरव

## (१) हरभटजी पटवर्धन

पटवर्धन कुळी कुलदीपक जे जहाले हरभटजी।
साधुसंतीया ख्याती केली ज्यावरी प्रभू राजी।।१।।
धर्मनिष्ठ बहु निःस्पृह ऐसे श्रीमंत गंभीर।
धैर्यवान जे शांतिरूप जगी भक्तिपंथी वीर।।२।।
दुर्वांकुररस प्राशन करुनी मुखी मंगलमूर्ती।
नामी रंगता रसना रंगुनी जहाले तपमूर्ती।।३।।
देव गजानन प्रसन्न जहाले माग काही म्हणती।
निष्कामचि जे अंतरी जहाले चरणांकित होती।।४।।
मंगल नामे मंगलमय जे मंगल मूर्ती भले।
मंगल करुनी मंगल भक्ता मंगल दान दिले।।५।।
गणेश भक्ताग्रणी धन्य ते परमपूज्य सकळा।
दासराम हा लीन प्रभुपदी गातो गुणलीला।।६।।
ब्राह्मणांचे हे राज्य दिसे आज। तया पहाता श्रीहरी सत्य काज।
जया लागी धरी छत्र महाराज। स्वामी मोक्षाचा गणाधिपराज।।७।।
स्नान संध्या गुरुधर्म चालवावा। आत्मप्राप्तीचा मार्ग वाढवावा।
सुखे आनंदे लोक हा पहावा। असे केले या हरीने जीवा।।८।।
काय पुण्याई असे ब्राह्मणांची। मूर्ती लाधली ही पूर्ण तपस्येची।
पराक्रमी ही अशी परंपरा ज्याची। भाग्यशाली शिलवान संस्कृतीची।।९।।
प्रजा नांदे सानंद छंदफंदी। चित्त वृत्ती हेलावे आनंदी।
उच्च शिक्षण मनी परिपूर्ण शुद्धी । जया कारण हे श्रीहरीच आधी।।१०।।
दासरामा हे समाधान झाले। हरीगुण हे गावोनी चित्त धाले।
करू सोहाळे ऐसीया सुवेळे। पुण्यतिथिदिनी गुण वाणि या रसाळे।।११।। (वही २०)

## २) संत काडसिद्धमहाराज

(सिद्धगिरिसंदेश त्रैमासिकाचे संस्थापक)

सिद्धगिरीचे राजे महाराजे चक्रवर्ति सिद्धगिरी। एकूणसत्तर वरुषे शोभविती सिद्धपिठ आजवरी।।१।।
लिंगायत धर्माचे मुख्यचि हे स्थान या जगी निगुती। काडसिद्ध माईसी मर्दुनिया नित्य येथ करी वसती।।२।।
निबंरगीमहाराजा सत्यचि ज्यांचा अनुग्रहो जाला। सत्पथ लुप्त म्हणवुनी नाम रुपाचा सुमार्ग दावियला।।३।।

मीरासाहेब येता व्याघ्रावरि बैसुनीच भेटाया। सर्पाचा चाबुक तो थक्क करी पाहताचि सकळा या।।४।।
काडासिद्ध ज्या दगडावरी सहजी बैसलेचि तो चाले। मीननाथ पूर्वीचे पाहुनिया दर्शने मनी धाले।।५।।
चाळीस पिढ्यावर ही परंपरा चालिली असे साच।परमकृपा सिद्धाची हेलावे वृत्ति हे पाहताच।।६।।
सिद्धांचिया कृपेने सिद्रामेश्वर प्रकाशिला तारा। भाऊराव समर्थे ओळखुनी त्या पदी दिला थारा।।७।।
त्यांचे अनुग्रहाने सिद्धगिरीश्वर तसे पुढे आले। राजयोग हा त्यांचा पाहुनिया वाटले नवल झाले।।८।।
निबरंगी नि चिमड इंचगिरी आणिक तसेचि निंबाळ। सांगलीत सत्कीर्ती दुमदुमली सागरापरी निखिल।।९।।
सामावुनी सकळही झोड उठविली रुढीवरी ज्यांनी। सिद्धगिरी संदेशी संदेशचि देती जे आवर्जोनी।।१०।।
ऐसीया मूळपिठा प्रेमेची दासराम वंदीतसे। सिद्धगिरीश्वर पदी या अकरा ही बिल्वपत्र अर्पितसे।।११।।
(वही ८९)

## ३) निसर्गदत्त महाराज, मुंबई

निसर्गदत्त अशी ही ठेवचि दिधली कशी निसर्गाने ।
सहज जीवनी साधे सुख सारे दाविलेची संधाने ।।१।।
सिद्धराम ईश्वर जो सिद्धवस्तु ही जगी कई विचरे ।
हेची खरे दावाया आला जगती जगात काय उरे।।२।।
कृपा तयांची निष्ठा तशीच पहाता निसर्गदत्तांची ।
अमृतमहोत्सवी या धमाल झालीच आत्मबोधाची ।।३।।
आत्मबोध आत्म्याचा अनात्म टाकोनी नित्य घ्यायाचा ।
एकची आत्मा उरता न लगे वारा ही काम द्वैताचा ।।४।।
श्रेष्ठची भक्त हा रे जे हाट मांडुनी सुबोध बोधाचा ।
हटविती माया जग हे घेती आस्वाद जेथ ऐक्याचा ।।५।।
फुल नाही फुलपाकळी समर्पितो दासराम संतासी ।
समारंभ भूषवी सद्भक्तचि मागे कृतज्ञता त्यासी ।।६।।
(वही ६८)

✻✻✻

९ चा पाठभेद :-
कैवल्यधामी हनुमत्समाधि स्वगृहीच गोविंदा।
सिद्धगिरीश्वर भेटती चिमडस्था काय वानू स्वानंदा।।९।।
११ चा पाठभेद :-
अहंब्रम्ह हे विसरुनी उरला जो भ्रम जगासी दावियले।
गुरुबंधु बहु जमवुनि (भाविकजन बहु जमवुनी)
शिवरात्रीचे महत्त्व वाढविले।।११।। वही ८९

# भाग ३ :– संकीर्ण श्लोक

## १) अश्वत्थ वृक्ष

वरी मूळ परी खाली शाखा अश्वत्थ तो असे ।
पानापानातुनी वेद जो जाणे वेद जाणतो ।।१।।
शाखा वरी आणि खाली जयाला गुणे वाढले ते विषयीच सारे ।
मुळे अधोभागी फुटती जयासी कर्मे दृढा जाहली मृत्युलोकी ।।२।।
त्याचे नसे रूप तेथे कुठेही बुडखा न शेंडा न खांदी जयाला ।
दृढ मूळ हा वृक्ष असे परी रे । असंगता शस्त्रची यासी तोडी ।।३।। (वही १११)

## २) आद्य पुरूष

तया पुढे जाऊनि शोधिताची
जेथोनी मागे फिरणेची नाही ।
असेची तो आद्य पुरुष पाही ।। (वही १११)

## ३) सांख्ययोग

न मारी न मरे आत्मा आत्मानात्मचि जाणता ।
सांख्ययोगचि श्रीकृष्णे द्वितीयाध्यायी बोलिला ।।१।। (वही १११)

## ४) अर्जुनाची स्थिति

गळाले ते धनुर्बाण मोहे स्वजना पाहुनी ।
न करी युद्ध मी ऐसे विषादे पार्थ बोलिला ।।१।। (वही १११)

## ५) प्रकृती

प्रकृती करिते कर्म जीव रामचि जाण रे ।
उपाधीने पातले की सर्व जाण असार रे ।।१।। (वही २१)

## ६) स्वरूपानुभवी

स्वरूपानुभवो ज्यासी सोमसूर्यचि सळसळे ।
सोहं हंस (जया) तेथे असंगत्वची प्रज्वले ।। (वही १०५)

## (७) सांगलीच्या हनुमान समाधि मंदिरातील औदुंबर पारकट्टा

हरीकीर्तनामृत तात्या नी मामा । हरीनाामपंथी जया थोर प्रेमा ।
तात्या तसे पंत काका आणि मामा । मनी वेड हे सर्वदा दासरामा ।। (सांगली माहात्म्य)

## (८) गोविंद नवमी

आली अति निकट गोविंद नवमी । संकीर्तनी साधू ते रामनामी ।
आराधनी सेवू प्रसाद प्रेमी । जे पर्वणी नाशी अहंत्वऊर्मी ।।

(वही ५०)

## (९) मामा महाराज केळकर रेखांकित ज्ञानेश्वर महाराजांचे चित्र

काषायांबर पादुकाहि चरणी मंदील श्रीमस्तकी ।
कर्णी कुंडल ती गळ्यात झळके रुद्राक्षमाळा निकी ।
हातामाजि कमंडलू नि बरवा शोभे भला दंड तो ।
गोविंदा पुढती प्रकाश रुप जे त्या ज्ञानिया वंदितो ।।

(अमृतवाणी)

## (१०) गुरुभक्त

जया मुक्तीची वासना पूर्ण आहे । तयाची गुरुचे पदी वृत्ति राहे ।
लये लक्षिता ते स्वरूपी सरावे । स्वयंज्योती पूर्ण प्रकाशे स्वभावे ।।१।।
मनीहूनिया टाकिला सर्व हेवा । सदा सर्वदा आचरी नीच सेवा ।
गुरूचे घरी झाडीतो सारवीतो । मला तो गमे भूतळीचा रवी तो ।।२।।
भवापासुनी सद्गुरु तारी बापा । सदा सौख्य दे छेदुनी पुण्यपापा ।
धरी कास मी दास तूझा दयाळा । दिना रक्षी तू दीनबंधू कृपाळा ।।३।।
पदा त्वं पदा तत्पदा काही नेणे । तुवा बोलिले ध्यान ते एक जाणे ।
खटाटोप आरोप टाकोनि राहे । त्रिकाळी सदा पाय तुझेचि पाहे ।।४।।
न जाये जपासी न जाये तपासी । न जायेचि काशी न जाये गयेसी ।
गुरुचिंतनेवीण कोठे न जाये । त्रिकाळी सदा पाय तूझेचि पाहे ।।५।।

(वही १२४)

***

# भाग ४ :- समश्लोकी

## १) अष्टादशनामगीता /अंतरगीता

वक्त्राणि पंच जानीहि पंचाध्यायाननुक्रमात् । दशाध्याया भुजाश्चैकमुदरं द्वे पदांबुजे ।।१।।
एवमष्टादशाध्यायी वाङ्‌मयी मूर्तिरीश्वरी । जानीहि ज्ञानमात्रेण महापातकनाशिनी ।।२।।
गीतानामानि वक्ष्यामि गुह्यानि शृणु पांडव । कीर्तनात् सर्व-पापानि विलयं यांति तत्क्षणात् ।।३।।
गीता गंगाा च गायत्री सीता संध्या सरस्वती । ब्रह्मविद्या ब्रह्मवल्ली त्रिसंध्या मुक्तिगेहिनी ।।४।।
अर्धमात्रा चिदानंदा भवघ्नी भय-नाशिनी । वेदत्रयी पराऽनंता तत्त्वार्थ-ज्ञान-मंजरी ।।५।।
इत्येतानि जपेन्नित्यं नरो निश्चलमानसः । ज्ञानसिद्धिं लभेच्छीघ्रं तथांते परमं पदम् ।।६।।
(इति श्रीवराहपुराणे शुक-शौनक-संवादे श्रीकृष्ण-प्रोक्तं श्रीमद्-भगवद्गीता -
माहात्म्यांतर्गतं भगवद्गीता-नामावलि-स्तोत्रं संपूर्णम्)
भगामाजी विराजे जो भगवानचि तो जगी । तयाची भगवद्गीता आकळे जाहल्या उगी ।।१।।
पंचमुखी वेदवक्त्री दहा प्राण दहा भुजा । विश्वोदर जियेलागी गती दोनी पदांबुजा ।।२।।
अशी अष्टादशाध्यायी गीता ही होय ईश्वरी । मूर्ति ते जाणुनी घेता महापाप करी दुरी ।।३।।
अध्याय अठरा ज्याचे ऐसी गीता चराचरी । अनुक्रमे[१] व्यापिली जी घेऊ[२] या नाद अंतरी।।४।।
गीतेची गुह्य जी नामे सांगतो ऐक अर्जुना । कीर्तनी सर्वही पापे लया जाती ततक्षणा ।।५।।
जीवनाचे प्रवाहात निनादे गीत जे स्वये । तेचि ते अक्षरी गीता अक्षरी पावली (व्यापिली) जये ।।६।।
षडचक्रावरी कैसी ऊर्ध्वगामी वहातसे । त्रिकूटाभीतरी गंगा वाहता नाद येतसे ।।७।।
गायनाचे कशी तंत्री गायत्री देवता वसे । चैतन्याचे असे गान देहभान जिथे नसे ।।८।।
सीता तेची जगन्माया दृश्य देहची दाविते । आत्मारामी विलासे जी आत्मारामची पाहते ।।९।।
नित्य ते नित्य जाणावे अनित्यात नसे कदा । असणे-नसणे-पैल आहे सत्याथ[३] सर्वदा ।।१०।।
इडा नी पिंगला देही एक होती जिये गती । सुषुम्ना ओघ जो वाहे बोलती त्या सरस्वती ।।११।।
आठवो एक ब्रह्माचा ब्रह्मविद्या स्वभावजा । नाठवा[४] असतो केवी (नुरवी) देहादिक करी वजा ।।१२।।
वायुस्वरूपिणी वल्ली गगनावरी जातसे । ते वल्ली ब्रह्मवल्ली जी जेथ ते ब्रह्मचि असे ।।१३।।
कर्म भक्ति तसे ज्ञान संधि हे साधिती तिन्ही । त्रिसंध्या संधिकाली जे साधिताती ऋषिमुनी ।।१४।।
बंधना वाचुनी जेथे गिवसे नित्य मुक्तता । मुक्तिमोहिनी हे गीता भाव गीतार्थ जाणता ।।१५।।
रामकृष्ण गती वाहे जीवनामाजी या सदा । एकारैंकारार्ध मात्रा नुरे जीवासी आपदा ।।१६।।
सोहं हंस सदा चाले त्यात जी पोकळी असे । तेथ जे उठते लहरी चिदानंदाची होतसे ।।१७।।

---

१. पाठभेद :- व्यापिली गीतरूपाने
२. पाठभेद :- घेऊनी
३. पाठभेद :- सत्या आहेची सर्वदा । (वही १५८ )
४. पाठभेद :- वाढवो भ्रम तो

झालेले हे कसे झाले कासयाचे पहा तरी । चैतन्याचा विलासू हा भवाची न उरे उरी ।।१८।।
द्वैतामाजी असे भीती द्वैत हे जाणता नसे। अद्वैती जी वसे गीता भयाचा नाश होतसे ।।१९।।
प्रणवाक्षरी ही गीता वेदत्रय जयामुळे । ज्ञान जाणीव जेथोनी त्रिमात्रेसह आकळे ।।२०।।
परेमाजी स्फुरे सारे स्फुरद्रूप सदा स्फुरे । ज्ञान गर्भ असे जेथे मोह शोक मुळी नुरे ।।२१।।
अनंतासी अंत नाही प्रारंभ जाहला कुठे ।आधले मधले दृश्य वाटे म्हणुनी वोखटे ।।२२।।
तत्पणा तत्त्व हे मोठे तत्त्वार्थ अर्थ जाणता । अर्थ हा जाणला नाही अनर्थ करी मागुता ।।२३।।
ज्ञानाची मंजरी ऐसी गीता शोधोनी लाधली । अष्टादश इची नामे सार्थ जी शोभली भली ।।२४।।
अष्टादश नाम गीता प्रेमे नेमे जपे जरी । ज्ञानसिद्धी घडे त्यासी जो का निश्चळ अंतरी ।।२५।।
मानसी स्थिर जो झाला गीत गीताही जाणुनी । पद श्रेष्ठचि पावे त्या अभ्यासेचि स्वये झणी ।।२६।।
गुरुलिंग झळाळे हे जेणे हे गीत बोधिले । साधू राम हनमुंते गोविंदे सार घेतले ।।२७।।
अष्टादशनामगीता घुमू दे नित्य जीवनी । ज्ञानेश्वरमहाराजा प्रार्थितो सत्य हे मनी ।।२८।।
गीतार्थ उकले कैचा गीता गीता जपू सदा । सोपे हे दासरामासी चिंतिता वाटले सदा ।।२९।।

(वही १०५)

❋

## २) श्री ज्ञानेश्वरी प्रसाद स्तोत्र –

| (ओवी) | (श्लोक) |
| --- | --- |
| १) ध्वजस्तंभावरी वानरु ।<br>जो मूर्तिमंत शंकरु ।<br>सारथ्य शारंगधरु ।<br>अर्जुनेसी ।।१।। | ध्वजस्तंभी या वानरु जो विलासे ।<br>शिवासारिखा जो स्वतेजे प्रकाशे ।<br>करी कृष्ण तो बोध हा अर्जुनाला ।<br>असा सारथी लाभला हो कुणाला ।।१।। |
| (२) अर्जुना समत्व चित्ताचे ।<br>तेचि सार जाण गा योगाचे ।<br>जेथे मन आणि बुद्धीचे ।<br>ऐक्य आथी ।।२।। | अरे अर्जुना साम्यचि चित्त होता ।<br>असे सार हे साधिता योग हाता ।<br>कसे ऐक्य गा होय मनासी बुद्धी ।<br>जिथे सारिली वृत्तिचिया उपाधी ।।२।। |
| (३) मग अर्जुने म्हणितले ।<br>देवा तुम्ही जे वाक्य बोलिले।<br>तेचि म्या निके परिसिले ।<br>कमळापती ।।३।। | अर्जुन हा बोलिला कृष्ण वरूता।<br>कृपाळूपणे बोधिले जी अनंता ।<br>असे ऐकिले कानि या बोखटेची ।<br>कमळापती आयु हे तेथ वेची ।।३।। |
| (४)आत्मसुखाचिया गोडिया।<br>विटे जो का सकळ विषया ।<br>जयाचिया ठायी इंद्रिया।<br>मानू नाही ।।४।। | आत्म्यातुनी सौख्य जे प्राप्त वहिले।<br>त्याचे पुढे सर्व पैं तुच्छ जहाले ।<br>नसे मान हा इंद्रियालागी तेथे ।<br>विषया तरी ठाव नसेचि जेथे ।।४।। |

(५) जो गेलिया से न करी ।
न पवता चाड न धरी ।
जो सुनिश्चळु अंतरी ।
मेरू जैसा ।।५।।

नसे प्राप्त जे चाड मनासी नाही ।
तसा शोक ना गेलियाचाची काही ।
वसे निश्चळू निश्चळी अंतरीया ।
जसा मेरू हा डंडळेनाची ठाया।।५।।

(६) सहज ब्रह्मरसाचे परगुणे।
अर्जुनालागी केले नारायणे ।
ते अवसरी पाहुणे ।
पातलो आम्ही ।।६।।

सहजामृताची अशी मेजवानी ।
तरी देतसे अर्जुना चक्रपाणी।
तिथे घ्यावया पाहुणेरु सुखाचा ।
आम्ही पाहुणे बोल हा संजयाचा ।।६।।

(७) ऐका मग श्रीअनंतु ।
पार्थासी असे म्हणतु ।
पै गा तू योगयुक्तु ।
जहालासी आता ।।७।।

वदे यावरी मागुती श्रीअनंत ।
कसा सत्य साची जगी होय पार्थ ।
तुला साधिला थोर ऐश्वर्ययोग ।
अवस्थाचि हे नाही कदा वियोग ।।७।।

(८) पै केशांचा गुंडाळा ।
वरी ठेविली स्फटिकशिळा ।
पाहिजे जव डोळा ।
तव भेदिली गमती ।।८।।

कसा नाडियांचा शरीरीच गुंथा ।
वरी ठेविली ज्ञानदृष्टी ही माथा ।
न भेदोनीही प्रत्यया येत सारे ।
पहाताचि डोळा भरे आत्मवारे।।८।।

(९) जो मज रिघे अनन्यशरण ।
तयाचे निवारी मी जन्ममरण।
या लागी शरणागता शरण्य ।
मीचि एकु ।।९।।

मला जो वरी एकभावे अनन्य ।
तया नाही रे जन्म आणि मरण ।
शरणागता मीचि एकू शरण्य ।
बरे पाहता साधन हेचि धन्य ।।९।।

(१०) नामजपयज्ञु तो परम ।
बाधू न शके स्नानादि कर्म ।
नामे पावन धर्माधर्म ।
नाम परब्रह्म वेदार्थे ।।१०।।

असे श्रेष्ठची या जगी नामयज्ञ ।
तयासी[१] नसे सोवळे आणि स्नान ।
स्वनामेची हे सर्व पवित्र पूर्ण ।
परब्रह्म हे नामचि वेदगान ।।१०।।

(११) आता याहीवरी एकादशी ।
कथा आहे दोन्ही रसी।
एथ पार्थ विश्व रूपेसी ।
होईल भेटी ।।११।।

एकादशी एक दशाचि पहाता ।
शांतादभुती सत्कथा शांत चित्ता ।
विश्वा प्रती पार्थ चित्तैक्य घडले ।
अद्वैत हे पूर्ण करोनि उरले ।।११।।

---

१. पाठभेद :- न लागे जया मर्म आपिक स्नान

(१२) जो खांडावया घाव घाली ।
की लावणी जयाने केली।
दोघा एकची साऊली ।
वृक्ष दे जैसा ।।१२।।

खांडावया लागुनी घाव करिता।
किंवा जरी लावणी एथ घडता।
दोघासीही साऊली वृक्ष धरिता ।
जयालागुनी साम्यता तेचि चित्ता ।।१२।।

(१३) जया ज्ञानालागी ।
गगन गिळताती योगी ।
का स्वर्गीची अडवंगी।
उमरडोनी ठेली ।।१३।।

आकाश ग्रासेची अध्यात्म ज्ञान ।
शब्दाचिया पैल योगी सुजाण ।
अडसर हे स्वर्गीचिया अरूते ।
करोनिया जाणती चैतन्य येथे ।।१३।।

(१४) ना ऐकिजे ते कानची वाळी ।
न देखिजे ते दिठीचि गाळी ।
अवाच्य ते टाळी ।
जीभची या ।।१४।।

अश्राव्य ते दूर सारीत श्रवण ।
पाहो नये दृष्टि न पाही आपण।
अवाच्य ते टाळीत जीभ पहाता ।
असे वर्म हे अर्जुना लागी हाता ।।१४।।

(१५) आता हृदय हे आपुले ।
चौफाळुनिया भले ।
वरी बैसवू पाऊले ।
सद्‌गुरूंची ।।१५।।

चौरंगी या श्रीहृदयीच चरण।
स्वये स्थापियेले श्रीगुरुराज धन्य ।
संसारी या नाही जे सत्य पहाता ।
चरणांबुजी ठेवीत नित्य माथा ।।१५।।

(१६) मावळवीत विश्वाभासु ।
नवल उगवला चंडांशु ।
अद्‌वयाब्जिनी विकासु ।
वंदू आता ।।१६।।

कसा मावळे विश्व आभास येथे ।
चित्सूर्य हा जेथ उदैत वरुते ।
अद्‌वैत हे फाकले कमल जेथे ।
नारायणी चित्त चिदैक्य होते ।।१६।।

(१७)विश्व विकसीत मुद्रा।
जया सोडवी तुझी योगनिद्रा ।
तया नमो जी गणेंद्रा ।
श्रीगुरुराया ।।१७।।

तुझे रूप हे विश्व विकास दावी ।
तव योगनिद्रेमुळे मुक्ति ठावी ।
नमस्कार हा तूजला रे गणेंद्रा ।
गुरुरूप तुझेचि प्रसन्न मुद्रा ।।१७।।

(१८) मग या अभिन्ना सेवा ।
चित्त मियाची भरेल जेव्हा ।
माझा प्रसाद जाण तेव्हा ।
संपूर्ण जहाला ।।१८।।

अभिन्नपणे साधिता नित्य सेवा ।
चित्तांतरी स्वरूप भरेल जेव्हा ।
परमात्मयाचाची प्रसाद बरवा ।
परिपूर्ण हा अर्जुनाचाची ठेवा ।।१८।।

(१९) बहुकाळ पर्वणी गोमटी ।
भाद्रपद मास कपिलाषष्ठी ।
प्रतिष्ठानी गोदातटी ।
लेखनकामाठी संपूर्ण जाहली ।।१९।।

बहु काळ ही पर्वपी थोर मोठी ।
पहाता तरी भाद्रपदात षष्ठी ।
प्रतिष्ठानी संशोधन पूर्ण झाले ।
ज्ञानेश्वरीचे वरदान दिधले ।।१९।।

ज्ञानेश्वरीतील प्रसाद बरवा । दिला एकनाथे असा गुह्य ठेवा ।
वरी दासरामी अशी अल्प सेवा । समर्पिली संत महानुभावा ।।२०।।

**इति श्रीमत्नाथसंकलितं श्रीज्ञानदेवभावार्थदीपिका अष्टादश ओव्यात्मकं ।**
**केवलाष्टादश ओव्यात्मकं गीतास्तोत्रं संपूर्णम् ।।**
**किंवा ज्ञानेश्वरी सूत्रपाठ स्तोत्रं संपूर्णम्** (वही १२४.)

✻

## ३) श्री दत्तात्रेय-प्रणीत-श्रीजीवन्मुक्त गीता

**अचिंत्य व्यक्त जे झाले महात्मा निर्गुणीच जो । ( नमन )**
**समस्ताधार विश्वासी श्रीगुरुलिंग वंदितो ।।**

**सर्व भूतांतरस्थाय नित्य-मुक्त-चिदात्मने ।**
**प्रत्यक्चैतन्य-रूपाय मह्यमेव नमो नमः ।।१।।**

सर्व भूतांतरा व्यापी नित्य मुक्त चिदात्म जो ।
चैतन्य जे प्रत्यया ये आदिकारण वंदु या ।।१।।

**जीवन्मुक्तिश्च या मुक्तिः सा मुक्तिः पिंड-पातने।**
**या मुक्तिः पिंड-पतने सा मुक्तिः शुनि सूकरे ।।२।।**

जीवन्मुक्ति पहा तेची देही जे प्रत्ययासी ये ।
देहपातांतरे मुक्ती श्वान सूकर भोगिती ।।२।।

**जीवः शिवः सर्वमेव भूतेष्वेवं व्यवस्थितः ।**
**एवं एवाभिश्यन् हि जीवन्मुक्तः स उच्यते ।।३।।**

शिवस्वरूप तो जीव भूत सृष्टीही व्यापिला ।
ऐसा हा प्रत्ययो ज्यासी जीवन्मुक्तचि बोलिला ।।३।।

**एवं ब्रह्म जगत् सर्वं अखिलं भासते रविः ।**
**संस्थितं सर्व-भूतानां जीवन्मुक्तः स उच्यते ।।४।।**

सर्व भूतांतरी ब्रह्म सर्वा सूर्य प्रकाशिजे ।
हाचि हा अनुभवो ज्याचा जीवन्मुक्तची तो असे ।।४।।

**एकधा बहुधा चैव दृश्यते जल-चंद्रवत् ।**
**आत्मज्ञानी तथैवैको जीवन्मुक्तः स उच्यते ।।५।।**

जळा माजी जसा चंद्र डोळा भासे बहूपरी ।
अनेकी एक जो पाहे जीवन्मुक्तचि तोचि तो ।।५।।

**सर्व-भूते स्थितं ब्रह्म भेदाभेदो न विद्यते ।**
**एकमेवाभिपश्यंश्च जीवन्मुक्तःस उच्यते ।।६।।**

सर्वा भूती वसे ब्रह्म भेदाभेद नसे जिथे ।
आत्मवत् सर्व जो पाहे जीवन्मुक्तचि धन्य तो ।।६।।

**तत्त्वं क्षेत्रं व्योमातीतं अहं क्षेत्रज्ञ उच्यते ।**
**अहं कर्ता च भोक्ता च जीवन्मुक्तः स उच्यते ।।७।।**

गगनाहुनि जो सूक्ष्म व्यापी क्षेत्रज्ञ क्षेत्र जो ।
कर्ता भोक्ताअसे तोची जीवन्मुक्तचि सत्य हा ।।७।।

**कर्मेंद्रिय-परित्यागी ध्यान-वर्जित-चेतसः ।**
**आत्मज्ञानी तथैवैको जीवन्मुक्तः स उच्यते ।।८।।**

कर्मेंद्रियासी त्यागी जो तसाची ध्यान वर्जित ।
आत्मानुभवी जो राहे जीवन्मुक्त पहा तरी ।।८।।

**शारीरं केवलं कर्म शोक-मोहादि-वर्जितम् ।**
**शुभाशुभपरित्यागी जीवन्मुक्तः स उच्यते ।।९।।**

शोकमोहादी वर्जूनी प्राणार्थ कर्म देहि जे ।
शुभाशुभ परित्यक्ता जीवन्मुक्त अहाचि जो ।।९।।

**कर्म सर्व समादिष्टं न जानाति च किंचन ।**
**(कर्म सर्वं यदादिष्टं)**
**कर्म ब्रह्म विजानाति जीवन्मुक्तः स उच्यते।।१०।।**

शास्त्रोक्त करूनि कर्म नसे जाणीव अल्प ही ।
ब्रह्म कर्म चि जो जाणे जीवन्मुक्त सदा असे ।।१०।।

**चिन्मयं व्यापिनं सर्वं आकाशं जगदीश्वरम् ।**
**सहितं सर्व-भूतानां जीवन्मुक्तः स उच्यते ।।११।।**

चैतन्य व्यापी सर्वासी आकाशी जगदीश्वर ।
आत्मत्वेचि विलोकी जो जीवन्मुक्त असंशय ।।११।।

**अनादिवर्ति भूतानां जीवः शिवो न हन्यते ।**
**निर्वैरः सर्व-भूतेषु जीवन्मुक्तः स उच्यते ।।।१२।।**

सर्वा भूतां अनादि जो जीव शिव स्वरूपची ।
निर्वैर वृत्ति सर्वासी जीवन्मुक्त म्हणोनि तो ।।१२।।

**आत्मा गुरुस्त्वं विश्वं च चिदाकाशो न लिप्यते ।**
**गतागतं द्वयो (द्वयं ?)नास्ति जीवन्मुक्तः स उच्यते ।।१३।।**

चिदाकाशा नसे लेप आत्मा तू गुरुरूपची ।
गतागत नसे जेथे जीवन्मुक्तचि नाव त्या ।।१३।।

**गर्भ-ध्यानेन पश्यंति ज्ञानिनां मन उच्यते ।**
**सोऽहं मनो विलीयंते जीवन्मुक्तः स उच्यते ।।१४।।**

चैतन्य ध्यान जो पाहे तो ज्ञानी एक जाण गा ।
सोहं माजी मने लीन जीवन्मुक्तचि नाम त्या ।।१४।।

**ऊर्ध्वं[१] ध्यानेन पश्यंति विज्ञानं मन उच्यते ।**
**शून्यं लयं च विलयं जीवन्मुक्तः स उच्यते ।।१५।।**

ऊर्ध्व ध्याने पहाती जे विज्ञान मन बोलिले ।
अवस्था लय शून्याची जीवन्मुक्तचि बोलिला ।।१५।।

**अभ्यासे रमते नित्यं मनो ध्यान-लयं गतम् ।**
**बंध-मोक्ष-द्वयं नास्ति जीवन्मुक्तः स उच्यते ।।१६।।**

रमे अभ्यासी जो नित्य ध्यानी मन विलीन जे ।
बंध मोक्ष नसे त्याते जीवन्मुक्त गमे कसा ।।१६।।

**एकाकी रमते नित्यं स्वभाव-गुण-वर्जितम् ।**
**ब्रह्म-ज्ञान-रसास्वादी जीवन्मुक्तः स उच्यते ।।१७।।**

रमे जो नित्य एकाकी स्वभाव गुण वर्जुनी ।
आस्वादी रस ब्रह्माचा जीवन्मुक्त गमे असा ।।१७।।

**हृदि ध्यानेन पश्यंति प्रकाशं क्रियते मनः ।**
**सोहं हंसेति पश्यंति जीवन्मुक्तः स उच्यते ।।१८।।**

हृदयातचि ध्यानाने प्रकाश करी जो मना ।
सोहं हंसची पाहे जो जीवन्मुक्त दिसे कसा ।।१८।।

**शिव-शक्ति-समात्मानं पिंड-ब्रह्मांडमेव च ।**
**चिदाकाशं हृदं मोहं जीवन्मुक्तः स उच्यते ।।१९।।**

शिव शक्ती समात्माची पिंड ब्रह्मांड त्यापरी ।
चैतन्य हृदयी पाहे जीवन्मुक्त दिसे पहा ।।१९।।

**जागृति-स्वप्न-सुषुप्तिं च तुरियावस्थितं सदा ।**
**सोहं मन विलीयेत जीवन्मुक्तः स उच्यते ।।२०।।**

ज्ञानावस्था सदा ज्याची सुषुप्ती स्वप्न जागृती ।
सोहंमाजी मने मुरला जीवन्मुक्त असा पहा ।।२०।।

---

१. पाठभेद :- उर्ध्व-ध्यानेन ।

| | |
|---|---|
| **सोहंस्थितं ज्ञानमिदं सूत्रेषु मणिवत् परम् ।** | सोहंमाजी जया ज्ञान सूत्रामाजी जसे मणी । |
| **सोहं ब्रह्म निराकारं जीवन्मुक्तः स उच्यते ।।२१।।** | सोहं निरामय ब्रह्म जीवन्मुक्तची जाण तो ।।२१।। |
| **मन एव मनुष्याणां भेदाभेदस्य कारणम् ।** | मन एक मनुष्याचे भेदाभेदासी मूळ जे । |
| **विकल्पं नैव संकल्पं जीवन्मुक्तःस उच्यते ।।२२।।** | मनाची उन्मनी होता जीवन्मुक्तची तोचि तो ।।२२।। |
| **मन एव विदुः प्राज्ञाः सिद्ध-सिद्धांत एव च।** | मन हे दृढ होताची सदा तो मोक्षची असे । |
| **सदा दृढं तदा मोक्षो जीवन्मुक्तः स उच्यते ।।२३।।** | सिद्धसिद्धांत हा प्राज्ञा जीवन्मुक्तची प्राज्ञ तो ।।२३।। |
| **योगाभ्यासी मनःश्रेष्ठः अंतस्त्यागी बहिर्जडः ।** | योगाभ्यासी मने श्रेष्ठ कोठे लिप्त नसेचि तो । |
| **अंतस्त्यागी बहिस्त्यागी जीवन्मुक्तःस उच्यते ।।२४।।** | बाहेरी आंतुनी त्यागी जीवन्मुक्तचि श्रेष्ठ तो ।।२४।। |

**जीवन्मुक्त अशी गीता दत्तात्रेय जगद्गुरु । बोधिती सूत्ररूपाने दासराम शिरी धरी ।।२५।।**

**इति श्री दत्तात्रेय प्रणीत-जीवन्मुक्त-गीता दासराम कृत समश्लोकीसह संपूर्ण ।।**

## ४) प्राकृत गुरुगीता

| | |
|---|---|
| **सूत उवाच :-** | सूत म्हणाले :- |
| **कैलास-शिखरे रम्ये भक्ति-साधन-हेतवे।** | कैलास शिखरावरती रम्य जे भक्तिसाधन । |
| **प्राणस्य पार्वती भक्त्या शंकरं परिपृच्छति ।।१।।** | नमस्कारोनिया प्रीती पार्वती पुसते शिवा ।।१।। |
| **पार्वत्युवाच :-** | पार्वती म्हणाली :- |
| **ॐ नमो देवदेवेश परात्पर जगद्गुरो।** | ॐ नमो देवदेवेशा परात्पर जगद्गुरु । |
| **सदाशिव महादेव गुरु-दीक्षां प्रदेहि मे ।।२।।** | सदाशिव महादेव गुरुदीक्षा करी मला ।।२।। |
| **केन मार्गेण भो स्वामिन् देही ब्रह्ममयो भवेत् ।** | स्वामी हे कोणत्या पंथी देही बह्मचि होईल । |
| **त्वं कृपां कुरु मे स्वामिन् नमामि चरणौ तव ।।३।।** | कृपा करा प्रभू स्वामी चरणाप्रती नमी तव ।।३।। |
| **सदाशिव उवाच :-** | सदाशिव म्हणाले :- |
| **मम रूपासि देवि त्वं त्वद्भक्त्यार्थं वदाम्यहम्।** | तुझे भक्तीमुळे देवी स्वरूपानुभव सांगतो। |
| **लोकोद्धार-करं प्रश्नं न केवापि कृतं पुरा ।।४।।** | असा प्रश्न कुणी पूर्वी केला नाहीच गे मला ।।४।। |
| **दुर्लभं त्रिषु लोकेषु तच्छृणुष्व वदाम्यहम् ।** | त्रैलोक्याही न जे सुलभ सांगतो ऐक तेचि तू । |
| **गुरुं ब्रह्म विनानान्यत् सत्यं सत्यं न संशयः ।।५।।** | गुरु ब्रह्मा विना नाही दुसरे सत्य निश्चित ।।५।। |
| **वेद-शास्त्र-पुराणानि इतिहास-विधानि च ।** | वेदशास्त्र पुराणे ही इतिहासविधा न जे । |
| **मंत्र-यंत्राणि विज्ञानं स्मृतिरुच्चाटणादिकम् ।।६।।** | मंत्र यंत्रादि विज्ञाने स्मृति उच्चाटणे पहा ।।६।। |

| | |
|---|---|
| शैवं शाक्तमागमादि अन्ये च बहवो मता:।<br>अपभ्रंश समस्तानि जीवानां भ्रांत-चेतसाम्।।७।। | आगमी शैव शाक्ती या बहूत असती मते ।<br>अपभ्रंश जगी सारे जीव हे फिरती सदा ।।७।। |
| यज्ञ-व्रतास्तपो दानं जपस्तीर्थं तथैव च ।<br>गुरु-तत्त्वमविज्ञाय मूढत्वमितरे जना: ।।८।। | यज्ञ व्रतादि तप गा जप दानादि तीर्थ ते ।<br>गुरुतत्त्वानुभूती गा मूढत्व इतराप्रती ।।८।। |
| गुरुस्त्वात्मनो नान्यं सत्यं सत्यं न संशय: ।<br>तल्लाभार्थं प्रयत्नानि कर्तव्यं सुमनीषिभि: ।।९।। | गुरु आत्माचि दुसरे ना सत्य सत्य असंशय ।<br>तयासाठी प्रयत्नादि कर्तव्य करिती जगी ।।९।। |
| गूढविद्या जगन्माया देहमज्ञान-संज्ञितम् ।<br>जायते तत्प्रसादेन गुरु-शब्देन कथ्यते ।।१०।। | जगन्माया गूढ विद्या देह अज्ञान बोधिले ।<br>त्या कृपे जाणती कोणी गुरु शब्दही बोलिला ।।१०।। |
| देही ब्रह्म भवेद् यस्मात् त्वत्कृपार्थं वदाम्यहम्।<br>सर्व-पाप-विशुद्धात्मा श्रीगुरो: पदपंकजम्।।११।। | देही ब्रह्मनुभूतीसी कृपेची तव बोलती ।<br>सर्व पाप नुरे काही श्री गुरुचरणामुळे ।।११।। |
| सर्व तीर्थवगाहस्य संप्राप्नोति फलं नर:।<br>गुरो: पादोद्भवं वारि पीत्वा शिरसि धारयेत् ।।१२।। | सर्व तीर्थी बुडी देता जे मिळे फल पार्वती ।<br>गुरु- पादोदके लाभे प्राशिता शिरी वंदिता ।।१२।। |
| शोषणं पाप- पंकस्य दीपनं ज्ञानतेजस: ।<br>गुरो:पादोदकं पीत्वा संसारार्णव-तारणम् ।।१३।। | होऊनी पाप निवृत्ती ज्ञानतेज फुले सदा ।<br>गुरुपादोदका घेता तरे संसार सागरी ।।१३।। |
| अज्ञान-मूल-हरणं जन्म-कर्म-निवारणम् ।<br>ज्ञान वैराग्य-सिद्ध्यर्थं गुरो: पादोदकं पिबेत् ।।१४।। | अज्ञान नाश होण्यासी चुकण्या जन्म कर्म हे ।<br>ज्ञान वैराग्य सिद्धीसी प्राशिजे गुरुतीर्थ हे ।।१४।। |
| गुरो: पादोदकं पीत्वा गुरोरुच्छिष्ट- भोजनम्।<br>गुरु-मूर्ते: सदाध्यानं गुरु-स्तोत्रं सदा जपेत्।।१५।। | गुरुतीर्थासी प्राशोनी त्यांचे उच्छिष्ट सेविजे।<br>सदा ध्याई गुरुमूर्ती गुरुस्तोत्र जपे सदा।।१५।। |
| स्व-देशिकस्यैव शरीर-चिंतनं<br>भवेदेतत्तस्य शिवस्य चिंतनम्।<br>स्वदेशिकस्यैव नाम-कीर्तनं<br>भवेदेतत्तस्य शिवस्य कीर्तनम्।।१६।। | आत्मानुसंधानी शरीर-चिंतन होईल तेची खलु आत्मचिंतन।<br>स्वरुपानुसंधानी जे नाम कीर्तन होईल तेची खलु आत्मकीर्तन।।१६।।<br>किंवा<br>स्वात्मानुबोधे स्वशरीर चिंतनहोईल तेची खलु आत्मचिंतन।<br>स्वरुपानुसंधानी जे नाम कीर्तन होईल तेची खलु आत्मकीर्तन।।१६।। |
| यत्पाद-रेणु-कणिका भुक्त्वा संसारवारिधे:।<br>सेतुं बंधयते नाथ देशिकं तमुपास्महे ।।१७।। | जयाचे पदरेणुही संसारार्णवी तारती ।<br>सेतूची हा गुरूनाथ त्यांचिये भक्ती तु करी ।।१७।। |
| यस्मादनुग्रहं लब्ध्वा महामंडलमसृजत् ।<br>तस्मै श्रीदेशिकेंद्राय नमश्चाभीष्ट-सिद्धये।।१८।। | ज्यांचे अनुग्रहे देवी परमामृत पाझरे ।<br>नमू त्या देशिकेंद्राला अभीष्ट साधण्याप्रती ।।१८।। |
| काशी-क्षेत्र-निवासी च जाह्नवी चरणोदकम् ।<br>गुरुर्विश्वेश्वर: साक्षात् तारकं ब्रह्म निश्चितम् ।।१९।। | काशीक्षेत्री असे वास चरणोदक जान्हवी ।<br>प्रत्यक्ष गुरु विश्वेश ब्रह्म तारक निश्चित ।।१९।। |

| | |
|---|---|
| शिर:पादांकितं भूत्वा गयास्तेचाक्षयो वटः ।<br>तीर्थराज-प्रयागो ऽ सौ गुरुमूर्तिं नमो नमः ।।२०।। | तत्पदांकित होताची गया ते वटअक्षय ।<br>तीर्थराज खरा तोची वंदितो गुरुमूर्तीते ।।२०।। |
| गुरु-मूर्तिं स्मरेन्नित्यं गुरुनाम सदा जपेत् ।<br>गुरोराज्ञां प्रकुर्वीत गुरोरन्यं नं भावयेत् ।।२१।। | स्मरे गुरुप्रती नित्य गुरुनाम सदा जपे ।<br>गुरु आज्ञाची पाळोनी न मानी दुसरे जगी ।।२१।। |
| गुरु-वक्त्रे स्थितं ब्रह्म प्राप्यते तत्प्रसादतः ।<br>गुरुमूर्ते:सदा ध्यानं नारी वै स्वैरिणी यथा ।।२२।।<br>कुल-स्त्रीस्वपतेर्यथा ।।२२।। | गुरुमुखी असे ब्रह्म प्रसादे लाभ होतसे ।<br>गुरुमूर्ती सदाध्यान कुलस्त्रीसी पती जसा ।।२२।। |
| स्वाश्रमं च स्वजातिंच स्वकीर्तिं पुष्टि-वर्धनम् ।<br>एतत् सर्वं परित्यज्य गुरोरन्यन्न भावयेत् ।।२३।। | आपुली जाती तशी कीर्ती तुष्टी पुष्टी नि आश्रम ।<br>सर्व ही सांडूनी एथे गुरु सेवी अनन्यता ।।२३।। |
| अनन्याश्रितयंतो मां सुलभं परमं सुखम् ।<br>तस्मात् सर्व -प्रयत्नेन गुरोराराधनं कुरु ।।२४।। | अनन्यत्वेची भजता सोपेची श्रेष्ठ हे सुख ।<br>म्हणोनिया प्रयत्नेची सद्‌गुरु भक्ती हे करी ।।२४।। |
| त्रैलोक्यं स्फुट- वक्तव्यं देवाद्याः सुरपन्नगाः।<br>गुरु -वक्त्र -स्थिता विद्या गुरुभक्त्या च लभ्यते ।।२५।। | स्फुट वक्तव्य त्रैलोक्यी करिती सुर पन्नग ।<br>गुरु मुखीच सद् विद्या लाभते गुरुभक्तीने।।२५।। |
| ध्रुवं तेषां च सर्वेषां नास्ति तत्त्वं गुरोः परम् ।<br>आसनं शयनं यानं कांचनं चापि भूषणम् ।।२६।। | सद्‌गुरूवाचूनी नाही निश्चळू दुसरे पद ।<br>आसने शयने याने तेवी कांचन भूषणे ।।२६।। |
| साधकेन प्रदातव्यं गुरोः संतोष - कारणम् ।<br>गुरोराराधनं कार्यं यत्प्रियं तन्निवेदयेत्।।२७।। | संतोष गुरुसी व्हावा ऐसे द्यावेची साधके ।<br>आराधना गुरुकार्य प्रिय जे गुरुसी वदे ।।२७।। |
| कर्मणा मनसा वाचा सदा चाराधयेद् गुरुम् ।<br>दीर्घदंडनमस्कारं निर्लज्जो गुरु -संनिधौ ।।२८।। | कायेने मन वाचेने आराधावा सदा गुरु ।<br>दीर्घ दंड नमस्कार लज्जा सांडोनि घालिजे ।।२८।। |
| शरीरमर्थसंप्राप्तं सद्‌गुरुभ्यो निवेदयेत् ।<br>आत्मदारादिकं लक्ष्मीं सद्‌गुरुभ्यो निवेदयेत् ।।२९।। | शरीरर्थ जे प्राप्त सद्‌गुरुलागी सांगिजे ।<br>स्त्रियादीक तशी लक्ष्मी आत्मानभूती बोलिजे ।।२९।। |
| कृमिकीटकभस्मविष्ठा दुर्गंधि मलमूत्रकम् ।<br>श्लेष्म रक्तं तथा चर्म वंचयेन्न वरानने ।।३०।। | क्रिमी कीटक दुर्गंधी मलमूत्र नी रक्तही ।<br>देह हा अस्थिमांसाचा परी बंचू नये कदा ।।३०।। |
| संसारवृक्षमारूढाः पतंतो नरकार्णवे ।<br>यश्च उद्धरते सर्वान् तस्मै श्रीगुरवे नमः।।३१।। | संसारावरी आरुढ जे नरकामाजी लोळती ।<br>अशाही तारीती जीवा ते गुरुपद वंदितो ।।३१।। |
| गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।<br>गुरुरेकं परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।३२।। | ब्रह्मा विष्णू महेशू तो एकची सद्‌गुरू असा ।<br>पर ब्रह्मची तो एक म्हणोनी गुरु वंदितो ।।३२।। |
| हेतवे जगतामेव संसारार्णव -सेतवे ।<br>प्रभवे सर्वविद्यानां शंभवे गुरवे नमः।।३३।। | जगाचे कारणू जो का संसारार्णवी नावची ।<br>सर्व विद्यां प्रभु जो का शंभुनाथासी वंदितो ।।३३।। |

**अज्ञान–तिमिरांधस्य ज्ञानांजन –शलाकया ।**
**चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः।।३४।।**

**अखंडमंडलाकारं व्याप्तं येन चराचरम् ।**
**तत्–पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ।।३५।।**

**त्वं पिता त्वं च मे माता त्वं बंधुस्त्वं च देवता ।**
**संसार –प्रतिबोधार्थं तस्मै श्रीगुरवे नमः ।।३६।।**

**यत्सत्येन जगत् सत्यं यत्– प्रकाशेन भाति यत् ।**
**यदानंदेन नंदति तस्मै श्रीगुरवे नमः ।।३७।।**

**यस्य स्थित्या इदं सत्यं यद् भाति भानु–रूप–वत्।**
**यत्प्रियान् प्रियपुत्रादि तस्मै श्रीगुरवे नमः।।३८।।**

**येन चेतयते हृदि चित्तं चेतयते नयम् ।**
**जाग्रत्–स्वप्न–सुषुप्त्यादि तस्मै श्रीगुरवे नमः ।।३९।।**

**यस्य ज्ञानादिदं विश्वं न दृश्येद् भिन्न–भेदत :।**
**सदेकरूपरूपाय तस्मै श्रीगुरवे नमः।।४०।।**

**'यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः' ।**
**अनन्य-भाव-भावाय तस्मै श्रीगुरवे नमः ।।४१।।**

**यस्य कारण–रूपस्य कार्यरूपेण भाति यत् ।**
**कार्य–कारणतामेकं तस्मै श्रीगुरवे नमः ।।४२।।**

**नानारूपमिदं सर्वं न केनाप्यस्ति भिन्नता ।**
**कार्यकारणमेवात्र तस्मै श्रीगुरवे नमः ।।४३।।**

**यदंघ्रि–कमल–द्वंद्वं द्वंद्व–ताप–निवारकम् ।**
**तारकं सर्वदापद्भ्यां श्रीगुरुं प्रणमाम्यहम् ।।४४।।**

**शिवे क्रुद्धे गुरुस्त्राता गुरौ क्रुद्धे शिवो न हि ।**
**तस्मात् सर्व–प्रयत्नेन श्रीगुरुं शरणं व्रजेत् ।।४५।।**

**वंदे गुरुपदद्वंद्वं वाङ्मनोतीत–गोचरम् ।**
**श्वेत–रक्त–प्रभा–भिन्नं शिवशिक्त्यात्मकं परम् ।।४६।।**

अज्ञान–तिमिरांधांसी ज्ञानांजन असेची जो।
उन्मीलती नेत्र जेथे म्हणोनी गुरु वंदितो ।।३४।।

अखंड मंडलाकार व्यापियेले चराचर ।
त्या पदा दाखवी जो का म्हणोनि गुरु वंदितो ।।३५।।

पिता तू माता ही तू ची बंधु तू मम देवता ।
संसारीया बांधू म्हणोनी गुरु वंदितो ।।३६।।

सत्य जेणे जगत् सत्य जे प्रकाशे प्रकाशवी ।
आनंदेची सुखोर्मी ते म्हणोनी गुरु वंदितो ।।३७।।

जे स्थिति सत्य हे झाले जे प्रकाशे दिसेची जे ।
जे प्रिय म्हणुनी सारे प्रिय[1] त्यासीच वंदितो ।।३८।।

चैतन्य हृदयी जेणे चित्ताला चिंतवी सदा ।
जागृति स्वप्न सुप्तादी म्हणोनि गुरु वंदितो ।।३९।।

जया ज्ञानेचि हे दृश्य साधर्म्ये न च भेदही ।
अस्तित्व–रूप जे एक म्हणोनि गुरु वंदितो ।।४०।।

जाणीवेने कळेना जे नेणिवे आकळेचि जे।
अनन्य भावे जे भावे म्हणोनि गुरु वंदितो ।।४१।।

जे का कारणरूपेची कार्यरूप प्रकाशवी ।
कार्य कारण जे एक म्हणोनि गुरु वंदितो ।।४२।।

नाना रूपची हे सर्व भिन्नता न कुठे कधी।
कार्यकारणरूपेची म्हणोनि गुरु वंदितो ।।४३।।

द्विदली वास हा ज्याचा द्वंद्वासी जे निवारक ।
सर्व आपत्तीही तारी म्हणोनि गुरु वंदितो ।।४४।।

शिव कोपे गुरु त्राता गुरु कोपे न शंकर ।
म्हणोनिया प्रयत्नाने गुरूसी शरण जाय पा ।।४५।।

वाङ्मनातीत हे पहाता सद्गुरुपद गोचर ।
श्वेत–रक्त–प्रभा–युक्त शिवशिक्त्यात्मक श्रेष्ठ जे ।।४६।।

१. पाठभेद :– प्रिय तो गुरु वंदितो

गुकारं च गुणातीतं रुकारं रूप-वर्जितम् ।
गुणातीतं स्वरूपं च यो दद्यात् सद्गुरुः स्मृतः।।४७।।

आग्निर्नेत्रमिव साक्षी चतुर्बाहुस्त्रिलोचनः ।
यश्चतुर्वदनो ब्रह्मा श्रीगुरुः कथितः प्रिये ।।४८।।

श्रीगुरोः परमं रूपं विवेकचतुरग्रतः।
मंद-भाग्या न पश्यंति अंधाः सूर्योदयं यथा।।४९।।

श्री-नाथ-चरण-द्वंद्वं यस्यां दिशि विराजते ।
तस्यै दिशे नमस्कुर्यात् भक्त्या प्रतिदिनं प्रिये ।।५०।।

तस्यै दिशे सततमंजलिरेष आर्य
प्रक्षिप्येत मुखरितो मधुरैर्द्विरेफैः ।
जागर्ति यत्र भगवान् गुरु-चक्रवर्ती
विश्वोदय-प्रलय-नाटक-नित्य-साक्षी ।।५१।।

श्रीनाथादि गुरुत्रयं गणपतिं पीठ-त्रयं भैरवं
सिद्धौघं बटुक-त्रयं पद -युगं दूतीत्रयं शांभवम्।
वीरेशाष्ट चतुष्क-षष्ठी-नवकं वीरावलि-पंचक
श्रीमन्मालिनि मंत्र-राज-सहितं वंदे गुरोर्मंडलम्।।५२।।

अभ्यस्तैः सकलैः किमु दीर्घकालमनिलैर्व्याधि- प्रदैर्दुष्करैः
प्राणायाम-शतैरनेक-करणैर्दुःखात्मकैर्दुर्जये ।
यस्मिन्नभ्युदिते विनश्यति बलवायुः स्वयं तत्क्षणात्
प्राप्तुं तत् सहजं स्वभावमनिशं सेवध्वमेकं गुरुम् ।।५३।।

गुरुर्देवो जगत् सर्वं ब्रह्मा-विष्णु-शिवात्मकम्
गुरोः परतरं नास्ति तस्मात् संपूजयेद् गुरुम् ।।५४।।

सर्व-श्रुति-गिरो-रत्नैर्विराजित-पदांबुजे ।
वेदांतांबुज-सूर्याय तस्मै श्रीगुरुवे नमः ।।५५।।

ज्ञानं विना मुक्ति-पदं लभ्यते गुरु-भक्तितः।
गुरुः सामान्यतो नास्ति साधको गुरुमार्गिणः ।।५६।।

यस्मात् परतरं नास्ति नेति नेति च या श्रुतिः।
मनसा वचसा चैव नित्यमाराध्ययेद् गुरुम् ।।५७।।

गुकार हा गुणातीत रुकारु रूपवर्जीत ।
गुणातीत स्वरूपासी दाखवी तोचि सद्गुरु।।४७।।

सूक्ष्मदेही नेत्र अग्नी करी वास त्रिलोचन ।
ब्रम्हा विष्णुही तेथेची सद्गुरु रूप गे प्रिये ।।४८।।

श्रीगुरु श्रेष्ठ हे रूप नित्य चत्वार अग्रिया ।
मंदभाग्या दिसेनाची अंधासी सूर्य हा जसा ।।४९।।

श्री नाथ चरणू जेथे अवस्थेसी विराजती ।
नमस्कारी तदावस्थे प्रेमे प्रतिदिनी प्रिये ।।५०।।

तया दिशे हस्त जुळोनी ठाती
प्रक्षेपणी येती मधूर शब्द ।
जेथे विभू श्री गुरु चक्रवर्ती
विश्वोदय-प्रलय दोहीत नित्य साक्षी ।।५१।।

श्रीनाथादि गुरुत्रया गणपती पीठ-त्रया भैरवा
सिद्धौघा बटुक-त्रया पदयुगा दूतीत्रया शांभवा।
वीरेशाष्ट चतुष्क षष्ठ नवका वीरावली पंचका
श्रीमत् मालिनि मंत्रराज सह या वंदू गुरुमंडला।।५२।।

अभ्यासा सकला कई दीर्घकाल अनिले व्याधीतही दुष्कर
प्राणायम शते अनेक करुनी दुःखात्मते दुर्धर ।
जेणे अभ्युदये विलीनचि बळे वायु स्वये तत्क्षणी
प्राप्ती ते सहजी स्वभाव मनिषे सेवागुणे श्रेष्ठची ।।५३।।

गुरुदेव जगत् सर्व ब्रह्माविष्णुशिवात्मक ।
गुरूविना नसे काही म्हणोनि गुरु पूजीजे ।।५४।।

सर्व श्रुती गिरारत्न विराजित पंदाबुजी।
वेदांतोद्भव सूर्यासी म्हणोनि गुरु वंदितो ।।५५।।

ज्ञानाविनाही मुक्ति ते लाभते गुरुभक्तीने ।
गुरु सामान्यसा नोहे गुरुमार्गीच साधक।।५६।।

जया श्रेष्ठ नसे काही नेती नेती वदे श्रुती ।
मनाने वा वाणीनेही नित्यचि सेविजे गुरु ।।५७।।

गुरु-कृपा-प्रसादेन बह्मा-विष्णु-शिवात्मकम् ।
सामर्थ्यं तत्प्रसादेन कैवल्यं गुरुसेवया ।।५८।।

गुरु कृपा प्रसादाने ब्रह्मा विष्णु शिवात्मक ।
सामर्थ्य त्या प्रसादाने गुरुसेवेत मोक्षची ।।५८।।

यस्य स्मरण-मात्रेण ज्ञानमुत्पद्यते स्वयम्।
स एव सर्वं संप्राप्य तस्मै श्रीगुरवे नमः ।।५९।।

ज्याचे स्मरणमात्रेची ज्ञानोत्पत्ती घडे स्वये ।
यापरी सर्वही प्राप्ती म्हणोनी गुरु वंदितो ।।५९।।

देव-गंधव-किंनराः पितरो यक्षाश्च चारणाः ।
मुनयोऽपि न जानंति गुरु-शुश्रूषणो विधिम् ।।६०।।

देव गंधर्व पितरा किंनरा यक्ष चारणा ।
ऋषी मुनी जाणती ना गुरुसेवा विधी कसा ।।६०।।

महाहंकार-गर्वेण विद्या-तप-बलान्विताः।
संसार-कुहरावर्ते घटियंत्रे यथा घटाः ।।६१।।

महाहंकार गर्वाने विद्या तप बलिष्ठ जो ।
संसार न सुटे त्यासी घाटियंत्रापरी क्रमू ।।६१।।

न मुक्ता देव-गंधर्वा पितरो यक्ष-किंनराः।
ऋषयो सर्वसिद्धाश्च गुरु-सेवा-पराङ्मुखाः।।६२।।

देव गंधर्व ना मुक्त पितर यक्ष किनर ।
ऋषी जे सर्वही सिद्ध गुरुसेवापराङ्मुख।।६२।।

ध्यानं श्रुणु महादेवि सदानंद-प्रदायकम् ।
सर्व-सौख्यकरं चैव भुक्ति-मुक्ति-प्रदायकम्।।६३।।

ध्यान ऐक महादेवी सदा आनंद-दायक।
सर्वही सौख्य देणारे भुक्ति-मुक्ति-फलप्रद।।६३।।

श्रीमत्परं ब्रह्म गुरुं भजामि श्रीमत्परं ब्रह्म गुरुं स्मरामि ।
श्रीमत्परं ब्रह्म गुरुं व्रजामि श्रीमत्परं ब्रह्म गुरुं स्मरामि ।।६४।।

श्रीमत् पर ब्रह्म गुरु भजो हा । श्रीमत् परब्रह्मगुरु स्मरा हा ।
श्री श्रेष्ठची ब्रह्म गुरु पुजू हा । श्रीश्रेष्ठची ब्रह्म गुरु नमू हा ।।६४।।

ब्रह्मानंदं परम-सुखदं केवलं ज्ञान-मूर्तिं
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षि-भूतं
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ।।६५।।

ब्रह्मानंद परम सुखद केवल ज्ञान मूर्ती
द्वंद्वापैल गगन सरिसा तत्त्वमस्येची लक्ष्य।
नित्यैकचि जो शुद्ध अचल बुद्धिसी साक्षिभूत
भावातीत त्रिगुणरहित सद्गुरु वंदितो हा।।६५।।

आनंदमानंदकरं प्रसन्नं
ज्ञानस्वरूपं निज-बोध-युक्तम् ।
योगींद्रमीड्यं भव-रोग-वैद्यं
श्रीमद्गुरुं नित्यमहं नमामि ।।६६।।

आनंद कर्ताची खरा प्रसन्न
ज्ञानस्वरूपी निजबोधमूर्ती ।
योगेश्वरु जो भवरोगवैद्य
श्री सद्गुरु नित्यचि वंदितो हा ।।६६।।

ब्रह्मांबुजे कर्णिक-मध्य-संस्थं
सिंहासने संस्थित-दिव्य-मूर्तिम्।
ध्यायेद् गुरुं चंद्र-कला-प्रकाशं
चित्-पुस्तकाभीष्ट-वरं दधानम् ।।६७।।

ब्रह्मांबुजा स्थापित कर्णमध्ये ।
सिंहासनी जे स्थित दिव्यरूपे ।
ध्याई गुरू चंद्र कलाप्रकाशा
चिद्ग्रंथराजासी वर प्रदान ।।६७।।

श्वेतांबरं श्वेत-विलेप-पुष्पं
मुक्ताविभूषं मुदितं द्विनेत्रम् ।
वामांक-पीठ-स्थित-शक्तिमीशं
मंदस्मितं शांतकृपा निधानम् ।।६८।।

असे शुभ्रची वस्त्र नि शुभ्र पुष्प
विभूषवी मुक्त चैतन्यनेत्र ।
पश्चिम पीठासी आरूढ ईश
सुहास्य हा शांत कृपा निधान ।।६८।।

| | |
|---|---|
| **यस्मिन् सृष्टिस्थिति-ध्वंसं विधानानुग्रहात्मकम्।<br>कृत्यं पंचविधं शश्वद् भासते तं नमः शिवम्॥६९॥** | उत्पत्ति स्थिती विधि लयही जे असे निग्रहात्मक ।<br>यापरी पंच आवस्थे वसे जो शिव वंदितो ॥६९॥ |
| **प्रातः शिरसि शुक्लाब्जं द्विनेत्रं द्विभुजं गुरुम् ।<br>वराभययुतं शांतं स्मरेत्तं नामपूर्वकम् ॥७०॥** | प्रात:काळी स्वयंतेज द्विनेत्र द्विभुजा गुरु ।<br>अभयवर प्रदाना जो शांत तो स्मरतो सदा ॥७०॥ |
| **पदाब्जं सर्वसंसारं दावकालानलस्वकम् ।<br>ब्रह्मरंध्रे स्थितांभोजमध्यस्थं चंद्र-मंडले ॥७१॥** | तत्पदी सर्व संसार दृश्य कालानलात्मक ।<br>बह्मरंध्री वसे जो का मध्यमी चंद्रमंडली ॥७१॥ |
| **कथा त्रिरेखावलिस्ते सहस्र-दल-मंडिते ।<br>हंस-पार्श्व-त्रिकोणं च स्मरेत् तनमध्यतो गुरुम्॥७२॥** | कथा त्रिकुटी हे ज्याची सहस्रदल मंडित ।<br>हंसपाठी भ्रुकुटी या माध्यमी स्मरतो गुरु॥७२॥ |
| **नित्यं शुद्धं निराभासं निरूपं निरुपाधिकम् ।<br>नित्यबोधं चिदानंदं गुरु-ब्रह्म नमाम्यहम् ॥७३॥** | नित्य शुद्ध निराभास अरूप निरुपाधि जो।<br>नित्य बोध चिदानंद गुरु बह्मासी वंदितो ॥७३॥ |
| **सकल-भुवन-सृष्टिः कल्पिता शेष-पृष्ठिः<br>निखिल-निगम-दृष्टिः संपदा व्यर्थ-दृष्टिः।<br>अधिगम-परमेष्ठीस्तत्पदार्थैक्य-दृष्टिः<br>भव-गण-परमेष्ठी मोक्ष-मार्गैक-दृष्टिः॥७४।** | सकळ जगत सृष्टी कल्पिली शेष पाठी ।<br>अखिल-निगम-दृष्टी व्यर्थ हे दृश्य दृष्टी ।<br>[१]सकल प्रमुख जे का तत्पदी ऐक्य दृष्टी ।<br>सकलही परमेष्ठी मोक्ष-मार्गस्थ दृष्टी ॥७४॥ |
| **सकल-सम-दृष्टिः सच्चिदानंद-दृष्टिः।<br>निवसतु मयि नित्यं श्रीगुरोर्दिव्य-दृष्टिः॥७५॥** | सकल समची दृष्टी सच्चिदानंद दृष्टी ।<br>मम हृदि विकसू[२]दे दिव्य दृष्टी गुरूंची ॥७५॥ |
| **न गुरोरधिकं न गुरोरधिकं न गुरोराधिकं न [३]गुरोरधिकम् ।<br>शिव-शासनतः शिव-शासनतः शिव-शासनतः<br>शिव-शासनतः॥७६॥** | न गुरुपरिस जगती अधिक न गुरुपरिस जगती अधिक।<br>शिवशासनता शिवशासनता शिवशासनता<br>शिवशासनता ॥७६॥ |
| **इदमेव शिवं त्विदमेव शिवम् ॥७७॥** | हे एक शिव ते एक शिव ॥७७॥ |
| **एवंविधं गुरोर्ध्यानं ज्ञानमुत्पद्यत्ते स्वयम् ।<br>तदा गुरूपदेशेन मुक्तोऽहमिति भावयेत् ॥७८॥** | यापरी गुरु ध्यानाने स्वयंभू ज्ञान होतसे ।<br>तसे गुरूपदेशाने मुक्त जीवचि होतसे ॥७८॥ |
| **गुरोर्निरोपितैर्मार्गैः मनःशुद्धिं च कारयेत् ।<br>अनित्यं खंडयेत् सर्वं यत्किंचिदात्मगोचरम्॥७९॥** | गुरुबोधेचिया मार्गे मन शुद्धीच होतसे ।<br>अनित्य खंडुनी सर्व चिदात्मा नित्य गोचर ॥७९॥ |
| **ज्ञेयं सर्वमतीतं च ज्ञानं च मन उच्यते ।<br>ज्ञानं ज्ञेयं समं कृत्वा पंथा नान्यद् द्वितीयकम् ॥८०॥** | सर्वा अतीत जे ज्ञेय ज्ञान ते मन होतसे ।<br>ज्ञान ज्ञेय समत्वेची पंथ ना दुसरा कुठे ॥८०॥ |

१. सकल परम अवधी

२. पाठभेद :- विकसो ही ।    ३. पाठभेद :- विदितं विदितम्

**एवं श्रुत्वा महादेवि गुरु-निंदां करोति यः ।**
**स याति नरकान् घोरान् यावद् भूतं दिवाकरः ।।८१।।**

यापरी ऐकुनी देवी गुरुनिंदा करेची जो ।
घोर नरक त्या प्राप्त यावच्चंद्र दिवाकर ।।८१।।

**यावत्कल्पांतको देहस्तावदेव गुरुं स्मरेत् ।**
**गुरुलोपो न कर्तव्यः स्वच्छंदो यदि वा भवेत् ।।८२।।**

जोवरी हा असे देह तोवरी गुरुला स्मरे ।
गुरुलोप न कर्तव्य स्वच्छंद वागणे जरी ।।८२।।

**हुंकारेण न वक्तव्यं गुरुं प्राज्ञैः कदाचन ।**
**गुरोरग्रे न वक्तव्यं गुरुलोपं न कारयेत् ।।८३।।**

हुंकारे न च बोलावे ज्ञानी जीवे गुरूपुढे ।
गुरूपुढे न वक्तव्य गुरुलोप नसो कधी ।।८३।।

**गुरुं हुंकृत्य हुंकृत्य गुरु-संनिध-भाषितम् ।**
**अरण्ये निर्जले देशे स भवेद् ब्रह्म-राक्षसः ।।८४।।**

अहंकारे जरी भाषा गुरु संनिध जाहली ।
निर्जलारण्य देशी या ब्रह्मराक्षस होतसे।।८४।।

**मुनिभिः पन्नगैर्वापि सुरैर्वा शापितो यदि ।**
**काल-मृत्यु-भयाद् वापि गुरू रक्षति पार्वति ।।८५।।**

मुनिपन्नग देवानी सद्भक्ता शापिले जरी ।
काल मृत्यु भयातोनी गुरु रक्षती पार्वती ।।८५।।

**अशक्ता हि सुराद्याश्च अशक्ता मुनयस्तथा ।**
**गुरु-शापो तदोत्पन्नो रक्षणाय न शक्यते ।।८६।।**

देवालागी नसे शक्ती मुनींची तेची पा गत ।
गुरु शापी जरी कोपा कोणी ना वाचवी तया ।।८६।।

**मंत्रराजमिमं देवि गुरुरित्यक्षरद्वयम् ।**
**यत् स्मृतिर्वेदवाक्यानि गुरुः साक्षात् परं पदम् ।।८७।।**

गुरू ही अक्षरे दोन देवी हा मंत्रराजची ।
साक्षात् गुरू असे श्रेष्ठ सांगताती श्रुति स्मृती ।।८७।।

**अग्निः शुद्धःधुमंतात नालापरि चकाधिया ।**
**मंत्रराजमिमं मन्येऽहर्निशं याति मृत्युताम् ।।८८।।**

अग्निठायी जसा धूर नालापरिच जो पहा ।
अहर्निश स्फुरे मंत्र यावज्जन्मची प्राणिया ।।८८।।

**श्रुतिं स्मृतिं अविज्ञाय केवलं गुरुसेवया ।**
**ते वै संन्यासिनः प्रोक्ता इतरे नामधारकाः ।।८९।।**

श्रुति स्मृति न जाणोनी गुरुसेवापरायण ।
संन्यासी बोलिले तेची बाकीचे नामधारक ।।८९।।

**नित्यं ब्रह्म निराकारं निर्गुणं बोधयेत् परम्।**
**सर्व ब्रह्म निराकारं दीपो दीपांतरैर्यथा।।९०।।**

ब्रह्म नित्य निराकार श्रेष्ठ हा बोध निर्गुण ।
सर्व ब्रह्म निराकार दीप दीपांतरी जसा ।।९०।।

**गुरु-प्रसादात् सर्वं आत्मारामं निरीक्षयेत् ।**
**अनेन गुरु-मार्गेण अज्ञानं न प्रवर्तते ।।९१।।**

गुरूचिया प्रसादाने सर्वात्माराम दर्शन ।
यापरी गुरुमार्गाने अज्ञान नुरिजे कदा ।।९१।।

**आब्रह्म-स्तंभ-पर्यंतं परमात्म-स्वरूपकम् ।**
**स्थावरं जंगमं चैव प्रणमामि जगन्मयम् ।।९२।।**

आब्रह्मस्तंभपर्यंत परमात्मस्वरूप हे ।
जड चैतन्य जे चाले जगद्रूपचि वंदितो ।।९२।।

**यदेजति तन्नैजति यद्दूरे तदु अंतिके ।**
**तदंतरस्य सर्वस्य तदु सर्वस्य बाह्यतः ।।९३।।**

यदि हा राहतो दूर नेति नेति म्हणे तया ।
तदानंतर सर्वात्मा अंतर्बाह्यही एकची ।।९३।।

| | |
|---|---|
| **वंदेऽहं सच्चिदानंदं भावातीतं सदा खलु ।<br>नित्यं पूर्णं निराकारं निर्गुणं स्वात्म-संस्थितम् ।।९४।।** | वंदितो सच्चिदानंद भावापैल खरा सदा ।<br>नित्य पूर्ण निराकार निर्गुणी[१] स्वात्म-स्थापित ।।९४।। |
| **परात्परतरं श्रेयं नित्यमानंद-कारकम्।<br>हृदयाकाश-मध्यस्थं शुद्ध-स्फटिकसंनिभम्।।९५।।** | नित्य आनंद देणारे ध्येय हे जे परात्पर।<br>हृदयाकाशी मध्यस्थ शुद्ध शुभ्र तथा परी ।।९५।। |
| **स्फटिक-प्रतिमा-रूपं दृश्यते दर्पणे यथा।<br>तथात्मनि चिदाकारमानंदं सोऽहमित्युत।।९६।।** | स्फटिक प्रतिमारूप भासते दर्पणी जसे ।<br>तसा आत्मा चिदाकार सोऽहमानंदरूपची ।।९६।। |
| **रूपातीतश्च पुरूषो ध्यायते चिन्मयं हृदि ।<br>तत्र स्फुरति भावोऽयं श्रुणु तत् कथयाम्यहम्।।९७।।** | पुरुष जो रूपातीत ध्याइजे हृदि चिन्मय ।<br>सोऽहं भाव स्फुरे तेथे सांगतो ऐकिजे सदा ।।९७।। |
| **अजोऽमजरोऽहं च अनादिर्नित्यते स्वयम् ।<br>अविकारी चिदानंदमणुयान् महतोऽस्म्यहम् ।।९८।।** | अजन्मा अजरा तेवी अनादि नित्य ते स्वये ।<br>अविकारी चिदानंद अणुपोटी महद्गुण।।९८।। |
| **अपूर्वं परमं नित्यं स्वयंज्योतिर्निरामयम् ।<br>विरजं परमाकाशं ध्रुवमानंदमव्ययम् ।।९९।।** | अपूर्व श्रेष्ठ जे नित्य स्वयंज्योती निरामय ।<br>विराजे परमाकाशी निश्चळानंद अद्वय ।।९९।। |
| **अगोचरं तथागम्यं रूपादि-नाम-वर्जितम् ।<br>नि:शब्दं तद् विजानीयात् स्वभावे ब्रह्म पार्वति।।१००।।** | अगोचर तसे गम्य [१]रूपादिनाम वर्जीत ।<br>नि:शब्द हे जाणताची स्वभावे ब्रह्म पार्वती ।।१००।। |
| **यथा गंध: स्वभावेन कर्पूरे कुसुमादिषु ।<br>शीतोष्णं च स्वभावेन तथा ब्रह्म च शाश्वतम् ।।१०१।।** | कर्पूरी कुसुमामाजी स्वभावेचि सुगंध हा ।<br>शीतोष्णादिक धर्मानि तैसे ब्रह्मचि शाश्वत।।१०१।। |
| **स्वयं तथाविधो भूत्वा स्थातव्यं यत्र कुत्रचित् ।<br>कीटो भृंगीररी ध्यानं तथा भवति सदृशी ।।१०२।।** | स्वयेची होऊनी तैसे कुठे स्थीरची होईजे ।<br>भृंगी कीटापरी ध्याने विधीने तेची पाविजे ।।१०२।। |
| **गुरु-ध्यानं सदात्यंतं स्वयं ब्रह्ममयो भवेत् ।<br>पिंडे पदे तथा रूपे मुक्तास्ते नात्र संशयः ।।१०३।।** | अखंडित गुरुध्याने स्वयं ब्रह्म घडे स्वये ।<br>देही विदेही तद्रूपे मुक्तरूप असंशय ।।१०३।। |
| **स्वयं ब्रह्ममयो भूत्वा तत्परं अवलोकयेत् ।<br>परात् परतरं नान्यत् सर्वमेव निरामयम् ।।१०४।।** | स्वये ब्रह्मची होवोनि श्रेष्ठ ते अवलोकी गा ।<br>श्रेष्ठची ते दुजे नाही जे का सर्व निरामय ।।१०४।। |
| **तस्यावलोकने प्राप्तं सर्व-संग-विवर्जितम् ।<br>एकाकी निःस्पृहः शांतं स्थातव्यं तत्प्रसादतः ।।१०५।।** | पाहुनी ते अशी प्राप्ती सर्व संगी असंगता ।<br>एकाकी निःस्पृह शांत त्या प्रसादे असे स्थित ।।१०५।। |
| **लब्धं वाऽथ न लब्धं वा स्वल्पं वा बहुलं तथा ।<br>निष्कामेनैव भोक्तव्यं सदा संतोष-भाजनम् ।।१०६।।** | लाभेचि वा अलाभाने थोडेफार म्हणेचि ना ।<br>निष्काम होऊनी भोगी सदा संतोष राखुनी ।।१०६।। |

१. पाठभेद:- निर्गुणी आत्मते स्थित ।

१. पाठभेद :- अनुमान नि प्रत्यक्ष

**मुक्तस्य लक्षणं चैव तवाग्रे कथितं मया ।**
**उपदेशो मया देवि गुरु-मार्गेण मुक्तिदः ।।१०७।।**

मुक्त लक्षण हे ऐसे जे खरे तुज बोधिले ।
उपदेश गुरूमार्गे देवी मुक्तिदायक ।।१०७।।

**गुरू-भक्तिस्तथा ध्यानं सकलं तव प्रकीर्तितम् ।**
**साधुत्वं च तथा दृष्ट्या तत्त्वे तिष्ठति सांप्रतम् ।।१०८।।**

गुरुभक्ती तसे ध्यान सारे सांगीतले तुला ।
साधुत्व हे तशी दृष्टी तत्त्वार्थे जाण सांप्रत ।।१०८।।

**श्रुत्वा प्रत्यक्षमेतद्धि अनुमान-चतुष्टयम् ।**
**यः स चात्मतया वेद सद्देशिकं सदा स्मर ।।१०९।।**

अनुमान[१] आणि प्रत्यक्ष श्रवणे चित्त स्थीर हे ।
असा अत्माचि होता गे सर्व देशी सदा स्मरे ।।१०९।।

**मननं यद्भवं कार्यं तद् वदामि महामते ।**
**लोकोकारकं देवि लौकिकं च विवर्जयेत् ।।११०।।**

जे का चिंतियले मी देवी ते तुज बोधिले ।
लोकोपकारी ऐसे हे लौकिकापैल जाण गा ।।११०।।

**लौकिकेन मनो यांति ज्ञानहीनाः परंतपे ।**
**ज्ञानिनां भावयेत् सर्व कर्म निष्कर्म-साम्यताम् ।।१११।।**

लौकिकी आणिता ज्ञान ज्ञानहीन परंतपे ।
ज्ञानाने लाभते सर्व कर्म नैष्कर्म्यसाम्यता ।।१११।।

**अथ फलम् ।**

**इमां तु भक्ति-भावेन पठने श्रणुयादपि ।**
**लिखित्वा यः प्रयच्छेत दानं दक्षिणया सह।।११२।।**

गुरुगीता ही पठता भावे श्रवण केलिया ।
लिहोनिया कुणा दान दिधले दक्षिणेसह ।।११२।।

**गुरुगीतामिमां देवि शुद्ध-सत्त्वं मयोदितम् ।**
**महाव्याधी गतः सर्वं स्वयमेव सदा जपेत्।।११३।।**

गुरुगीता अशी देवी शुद्ध सत्त्वेचि निर्मिली ।
सदा ही जपता कोणी महाव्याधी नुरे तया ।।११३।।

**तत्फलं कोटि-गुणितं कलां नार्हति षोडशीम् ।**
**गुरुगीताक्षरैरेकं श्रेयो राजमिमं जपेत् ।।११४।।**

कोटिगुणे फला देई सोळावी चित्कला स्फुरे ।
गुरुगीताक्षरू एक श्रेय श्रेष्ठ तरी जपे ।।११४।।

**सर्व-पाप-विनाशध्वं सर्व-दारिद्र्य-नाशनम् ।।११५।।**

सर्व पापेही नासोनी दारिद्र्य नुरते कदा ।।११५।।

**काल-मृत्यु-भय-हरं सर्व-संकट-नाशनम् ।**
**यक्ष-राक्षस-भूतानां चोर-व्याघ्र-भयापहम् ।।११६।।**

कालमृत्युभयातीत सर्व-संकट-मोचन ।
यक्षराक्षसभूतादी चोर वाघ नुरे भय ।।११६।।

**सर्वोपद्रव-नाशं च कु-सेवा-दुष्ट-नाशनम् ।**
**श्रेयो यत्पाद-तीर्थं च विभूतिः सिद्धिदा भवेत् ।।११७।।**

सर्वोपद्रव नासोनी कुसेवा दुष्टनाशक ।
पादतीर्थ विभूतीने सिद्धिप्रदची होतसे ।।११७।।

**अथवा मोहनं वश्यं नाम जाप्ये भवेति च ।**
**उत्तरे शांति-जाप्यं च वश्ये पूर्वमुखस्तथा।।११८।।**

अथवा मोहुनी वशही कोणी नाम जपे जरी ।
उत्तराभिमुखे शांती पूर्वाभिमुख इष्ट ते ।।११८।।

**धैर्ये शुक्ले शांतिकरं वश्यके तु प्रकीर्तितम् ।**
**पद्मासने जपेन्नित्यं शांतिवश्यकरं परम् ।।११९।।**

शुक्लपक्षे शांतिकरी कीर्तिमानची होतसे ।
पद्मासनी जपे नित्य शांतिसागर तो पहा ।।११९।।

**मोहनं सर्वभूतानां बंधवश्यकरं परम् ।**
**देव-अग्नि-प्रिय-करं राजा-जन-वशी भवेत् ।।१२०।।**

सर्व भूताप्रती मोही जगमित्रची होतसे ।
प्रिय जो देव अग्नीने राजा जन तया वश ।।१२०।।

**मुख-स्तंभ-करं वश्यं गुणाद् भवति वर्धनम् ।
दुष्कर्म-नाशनं चैव तथा सत्कर्मसिद्धिदम् ।।१२१।।**

**असिद्धं सिद्धते कार्यं नव-ग्रह-भयापहम् ।
सर्व-व्याधि-विनाश-घ्नं बाल-ग्रह-भयापहम् ।।१२२।।**

**दुःस्वप्न-नाशनं चैव महा-मंगल-शोभनम् ।
सर्व-शांति-करं नित्यं तथा वंध्यादि-पुत्रदम् ।।१२३।।**

**अवैधव्य-करं स्त्रीणां सदा सौभाग्य-दायकम् ।
आयुरारोग्यमैश्वर्यं पुत्र-पौत्र-प्रवर्धनम् ।।१२४।।**

**अकामस्त्री च विधवा मृत्ते मोक्षामवाप्नुयात् ।
अवैधव्यं च कामेन प्राप्यते चान्य-जन्मनि।।१२५।।**

**सर्व-दुःख-भयं विघ्नं कैवल्यं शाप-हारकम् ।
सर्वबाधा-प्रशमनं धर्मार्थ-काम-मोक्षदम्।।१२६।।**

**यं यं चिंतयते कामं तं तं प्राप्नोति निश्चितम् ।
कामदं कामधेनुश्च कल्पितं कल्पवृक्षकम्।।१२७।।**

**चिंतामणिश्चिंतितस्य सर्व-मंगल-कारकम् ।
लिखित्वा पूजितो येन मोक्षश्रेयमवाप्नुयात्।।१२८।।**

**काम्येन जपते यो वै तस्य काम-फल-प्रदम् ।
एते वै शाक्तिकाः सौरा गाणपत्याश्च वैष्णवाः ।।१२९।।**

**अथ काम्य-जप-स्थानं कथयामि वरानने ।
सागरांते सरित्-तीरे तीर्थे हरिहरालये ।।१३०।।**

**शक्ति-देवालये गोष्ठे तीर्थे चान्ये च पुण्यके ।
वटस्थांते मूलधात्री मठे वृंदावने तथा ।।१३१।।**

**पवित्रे निर्मले देशे जपानुष्ठान-तोषिना ।
न निर्वेदेन न मौनेन जपमेतत् समारभेत् ।।१३२।।**

**जपेन फलमाप्नोति अनंत-फलमाप्नुयात् ।
हीन-कर्म त्यजेत् सर्वं स्थानानि अधमानि च ।।१३३।।**

**स्मशाने भय-भूमौ च वट-मूलांत-कानने ।
वर्तते कनके मूले चूत-वृक्षस्य संनिधौ ।।१३४।।**

बोलका तो मुखस्तंभ गुणांची वाढ होतसे ।
दुष्कर्म नाश पावोनी सत्कर्म सिद्धिदायक ।।१२१।।

असिद्ध कार्ये ते सिद्ध नासे भय नवग्रह ।
सर्व व्याधी निवारोनी बालग्रह नुरे तया ।।१२२।।

दुःस्वप्न नाश पावोनी महामंगल भूषवी ।
शांतिकारी सदा नित्य वंध्येसी पुत्रदायक ।।१२३।।

सौभाग्यस्त्रीसि सौभाग्य सदा लाभेची यापरी ।
आयुरारोग्य ऐश्वर्य पुत्रपौत्रही वाढती ।।१२४।।

निष्काम स्त्री जी विधवा मोक्षा जाय निवर्तल्या ।
सौभाग्य स्त्री सकामेची इच्छेपरीच जन्मते ।।१२५।।

सर्व संकट पापादी शापापासोनि मुक्तता ।
सर्व बाधा निवारोनी पुरुषार्थ-प्रदायक ।।१२६।।

जे जे मनी असे इच्छा ते ते पावती निश्चित ।
कामधेनु कल्पतरू चिंतिताची फलप्रद ।।१२७।।

चिंतामणी चिंतितासी सर्व मंगलकारक ।
लिहिता पूजिता माने श्रेय हे मोक्षदायक ।।१२८।।

सकामे जपता कोणी त्याचे कामची होतसे ।
शाक्त सौरा गाणपत्या वैष्णवालागी यापरी ।।१२९।।

आता काम्य-जप-स्थाने सांगतो तुज पार्वती ।
सागरे नदीतीरासी तीर्थी आणिक देऊळी ।।१३०।।

देवालये आणि गोठे तीर्थेही पुण्यभूमी गा ।
वटमूले मठामाजी वृंदावन तयापरी ।।१३१।।

पवित्र निर्मळ स्थानी जपानुष्ठान साधिजे ।
मौनादि सर्व सांडोनी आरंभी जप पार्वती ।।१३२।।

जपाने जय पावोनी अनंत फळ येतसे ।
अधमस्थान सांडोनी हीन कर्मही त्यागिजे ।।१३३।।

स्मशान भयभूमीते वटमूलही पार्वती ।
तेवीच कनक मूले गा चूत वृक्षासी संनिध ।।१३४।।

**पश्चिमे शिरसि जाप्यं दक्षिणे चाभिकारकम् ।**
**ध्यायन् शुक्लं शांतिकरं अवश्यं ते प्रकीर्तितम् ।।१३५।।**

पश्चिमेसी सहस्रारी दक्षिणे अभिकारक ।
ध्याता शुक्ले शांतिकारी अवश्यक प्रबोधिले ।।१३५।।

**गुरुगीता प्रयाणे वा संग्रामे रिपुसंकटे ।**
**उग्र-ध्यानं कुक्कुटस्थं हीन-कर्म फल-प्रदम् ।।१३६।।**

गुरुगीता प्रवासात युद्धकाळी नि संकटी ।
उग्रध्यान कुक्कुटस्थ हीन कर्म फलप्रद ।।१३६।।

**जपते जयमाप्नोनि मरणे मुक्ति-दायकम् ।**
**सर्व-कर्म च सर्वत्र गुरु-पुत्रस्य सिध्यति ।।१३७।।**

जपता जयप्राप्ती ते मरणी मुक्तिदायक ।
सर्व ठायी सर्व कर्म गुरुपुत्रासी साध्यची ।।१३७।।

**गुरुमंत्रो मुखे यस्य तस्य सिध्यंति नान्यथा ।**
**शुभ-कर्माणि सर्वाणि दीक्षाः स्व-सिद्धि-दाः ।।१३८।।**

गुरुमंत्र मुखे ज्यासी त्यासी सिद्धि न आणिक ।
शुभ कर्मे तरी सर्व स्वसिद्धी ही अनुग्रहे ।।१३८।।

**संसार-मल-नाशाय भव-पाश-निवृत्तये ।**
**गुरु-गीतांभसि स्नानं तत्त्वज्ञः कुरुते सदा ।।१३९।।**

संसार-मल-नाशार्थ भव पाश विमुक्तीसी ।
गुरुगीताजले स्नान तत्त्वज्ञ करिती सदा ।।१३९।।

**सर्वं जगद्-गुरुः साक्षी सदसद्-ब्रह्म-वित्तमः ।**
**तस्य स्थानानि वर्णानि पवित्राणि न संशयः ।।१४०।।**

सदसद् ब्रह्म जाणे जो साक्षी सर्व जगद्गुरु ।
तयाची सर्वही स्थाने पवित्रची असंशय ।।१४०।।

**आसनस्थो शयानस्थो गच्छन् तिष्ठंस्तपोऽपि वा ।।१४१।।**

आसने आणि शयने तप हे तो तपस्वी गा ।।१४१।।

**शुचिष्मांश्च सदा ज्ञानी गुरुगीतां सदा जपेत् ।**
**तस्य दर्शन-मात्रेण पुनर्जन्म न विद्यते ।।१४२।।**

पवित्र जो असा ज्ञानी गुरुगीता असा जपे ।
तया दर्शनमात्रेची पुनर्जन्म नुरेची गा ।।१४२।।

**तथैव ज्ञानी जीवात्मा परमात्मनि सर्वदा ।**
**एकेन रमते ज्ञानी यत्र यत्र दिवा निशि ।।१४३।।**

तसाच ज्ञानी जीवात्मा परमात्मरूप सर्वदा।
एकातची रमे ज्ञानी रात्रंदिन पहा तरी ।।१४३।।

**एवंविध-महा-मुक्ता सर्वदा वर्तते सदा ।**
**तस्य सर्व-प्रयत्नेन भाव-भक्तिं करोति यः ।।१४४।।**

अशापरी महामुक्त अखंड वर्ततो सदा ।
तया सर्व प्रयत्नाने भाव-भक्तीच होतसे ।।१४४।।

**सदा हि तोषितो सर्व-मुक्तो भवति पार्वति।**
**भुक्ति-मुक्ती सदा तेषां जिह्वाग्रे वर्तते सदा ।।१४५।।**

सदा संतुष्ट तो सर्वी होतसे मुक्त पार्वती ।
भुक्ती मुक्ती तयाचिया वदनी वर्तते सदा ।।१४५।।

**अन्ये संसारिणः सर्वे गुरुगीतां जपेस्तु यः ।**
**सर्व-सिद्धिमवाप्नोति भुक्तिं मुक्तिं च विंदति ।।१४६।।**

अन्य संसारीकालागी गुरुगीता सदा जप ।
लाभती सर्व सिद्धी त्या भुक्ती मुक्ती तयासिया ।।१४६।।

**सत्यं सत्यं पुनः सत्यं धर्मसांख्यं मयोदितम् ।**
**गुरु-गीता-समं नास्ति गुरोस्तत्त्वं परं पदम् ।।१४७।।**

सत्य सत्य पुनः सत्य धर्मासांख्य प्रकर्ष हा ।
गुरुगीतेसी न तुळे श्रेष्ठ तत्त्व गुरुपद ।।१४७।।

**एको देव एक-धर्म एक-निष्ठा परंतपे ।**
**गुरोः परतरं नास्ति त्रिवचः कथयाम्यहम् ।।१४८।।**

एक देव एक धर्म एक निष्ठा खरे तप ।
गुरूविना नसे काही त्रिवार सांगतो तुला ।।१४८।।

**माता धन्या पिता धन्यो धन्य-वंशकुलोद्भवम् ।**
**धन्या च वसुधा देवी गुरुभक्तिषु दुर्लभम् ।।१४९।।**

माता धन्य पिता धन्य धन्य वंश कुलोद्भव ।
धन्य ते पृथिवीमाता गुरुभक्ति ही दुर्लभ ।।१४९।।

**शरीरमिंद्रिय-प्राणा अर्थ-स्वजन-बांधवाः ।**
**मातृ-पितृ-कुलं देव-गुरुमेव परं स्मरेत् ।।१५०।।**

शरीर इंद्रिय प्राण अर्थ आप्तेष्ट बांधव ।
कुलदेव पिता माता गुरु हाचि स्मरे सदा ।।१५०।।

**आकल्प-जन्मना कोटि-जप-व्रत-तपः-क्रियाः ।**
**तदिदं सुफलं देवि गुरु-संतोष-कारणात् ।।१५१।।**

आकल्प जे जन्म कोटी जप व्रत तप क्रिया ।
फलप्रद घडे सर्व संतोष पावता गुरु ।।१५१।।

**विष्णु-रुद्रौ च ब्रह्मा च देवाश्च पितृ-किंनराः ।**
**सिद्ध-चारण-यक्षाणां अन्ये च मुनयो जनाः ।।१५२।।**

विष्णु रुद्र आणि ब्रह्मा किंनरु पितृ देवही ।
सिद्धचारण यक्षासी आणिक मुनींना पहा ।।१५२।।

**आसक्ता मंद-भाग्याश्च ये जना नानुमन्यते ।**
**गुरुसेवां च विमुखाः सत्यं सत्यं वरानने ।।१५३।।**

विन्मूख गुरुसेवेसी सत्यसत्यची पार्वती।
आसक्त तो मंदभाग्य जो असा वर्ततो पहा ।।१५३।।

**गुरुभावः परं तीर्थं अन्यतीर्थं निरर्थकम् ।**
**कन्या-पुत्र-गृह-ग्रस्ताः स्व-कांता तत्पराङ्मुखाः।।१५४।।**

गुरुभाव श्रेष्ठ तीर्थ अन्य तीर्थ निरर्थक ।
कन्या पुत्र गृहे ग्रस्त स्वकांता हे पराङ्मुख ।।१५४।।

**इदं रहस्यं केन पृष्टं न वक्तव्यं महासखे ।**
**सुगोप्येन तवाग्रेण ममात्मासु तव प्रिये ।।१५५।।**

हे रहस्य कुणी पुसता न वदेची महासखे ।
गौप्य हे नच सांगावे कोणी प्रिय असोनिही ।।१५५।।

**स्वामि-मुख्या गणेशादि शिष्या ये ऊर्ध्वरेतसः ।**
**न वक्तव्यं महामाये मम पादौ स्पृशस्वह ।।१५६।।**

स्वामी मुख्य गणेशादि शिष्य ऊर्ध्वगामी गा ।
सांगू नको महामाये सांगू काय आणि तुला ।।१५६।।

**अतीव-पक्क-चित्ताश्च श्रद्धा-भक्ति-समन्विताः।**
**वक्तव्यं तु इदं देवि ममात्मासि सदा प्रिये ।।१५७।।**

पक्व चित्त असे ज्यांचे श्रद्धा भक्ति अशा गुणे ।
सदा प्रिय मला होती त्याप्रती सांग पार्वती ।।१५७।।

**।। इति श्रीस्कंदपुराणे उत्तरखंडे ईश्वर-पार्वती-संवादे गुरुगीता संपूर्णा अस्तु ।।**

(वही७९)

(समारोप)

गुरुलिंग कृपेने ही गुरुगीता ही प्राकृत ।
स्फुरली दासरामासी अर्पितो तत्पदांबुजी ।।

(वही१४७)

✻✻✻

# भाग ५ :– हरिपाठ

## १) हरिपाठ स्वरूप

हरीपाठ चिमडेश आळंदि क्षेत्री । हरीपाठ हा ऐकति स्वात्मश्रोत्री ।
हरीपाठ हा गर्भगुडीत झाला । हरीपाठ ज्ञानेश ज्ञाना मिळाला ।।१।।

हरीपाठ हा भेटवी श्रीहरीला । हरीपाठ सायुज्य देई पदाला ।
हरीपाठि या धन्य संसारि झाला । हरीपाठ हा पांडवी पाठ केला ।।२।।

हरीपाठ हा वेदशास्त्रासि सार । हरीपाठ गाता तरले अपार ।
हरीपाठ मंथोनि घेती अनंता । हरीपाठ हा एकची आत्मसत्ता ।।३।।

हरीपाठ हा सर्व संगासि सोडी । हरीपाठ हा देह बंधासि तोडी ।
हरीपाठ लावी हरीनाम गोडी । हरीपाठ हा मोक्ष तात्काळ जोडी ।।४।।

हरीपाठ हा ऐकता दोष जाती । हरीपाठि या साधनी स्थीर होती ।
हरीपाठ हे ज्ञान वैराग्य जेथे । हरीपाठ सामर्थ्यचि मुक्ति तेथे ।।५।।

हरीपाठ ही अमृतरत्नखाणी । हरीपाठ हा सत्य कैवल्य दानी ।
हरीपाठ ही माऊली सज्जनांची । हरीपाठ विश्रांति साऱ्या जिवांची ।।६।।

हरीपाठ हा गाति निवृत्तिनाथ । हरीपाठ हा सेविती एकनाथ ।
हरीपाठ नामा तुकाराम गाती । हरीपाठ श्रीसच्चिदानंदमूर्ती ।।७।।

हरीपाठ जे वाचिती नित्यनेम । हरीपाठ त्यासी करी पूर्ण काम ।
हरीपाठि हे श्रेष्ठ आयुष्य वेची । हरीपाठ संध्या तरि वैष्णवांची ।।८।।

हरीपाठ हा थोरचि पुण्यराशी । हरीपाठ चित्सौख्य लाभे जिवासी ।
हरीपाठ श्रीमाऊलीचीच लीला । हरीपाठ इंद्रायणी घोष झाला ।।९।।

हरीपाठ हे ध्यान पुरुषोत्तमाचे । हरीपाठ स्वरूप पुरुषोत्तमाचे ।
हरीपाठ हे बोल पुरुषोत्तमाचे । हरीपाठ पाठांतर नित्य वाचे ।।१०।।

हरीपाठ भक्ती बहू माऊलीची । हरीपाठ ही धारणा जीवनाची ।
हरीपाठ प्रीती न पुरे तयाची । हरीपाठ त्या नित्य समाधि कैची ।।११।।

हरीपाठ हा श्रीहरि सांगताहे । हरीपाठि ज्ञानेश विष्णूचि होये ।
हरीपाठि गोविंद अखंड राहे । हरीपाठ गीता मराठी दिसो ये ।।१२।।

हरीपाठ हेची अनुष्ठान मोठे । हरीपाठ पुरश्चरणी रहाटे ।
हरीपाठ हा भक्ती सोपान जीवा । हरीपाठ हा तो खलु मुक्तिठेवा ।।१३।।

हरीपाठ तुकयादिक लक्ष वाहे । हरीपाठ ऐसा कृतीपाठ आहे ।
हरीपाठ जे का वहाते सुषुम्ना । हरीपाठ अठ्ठाविस नित्य जाणा ।।१४।।

हरीपाठ गातातिं हैबती बाबा । हरीपाठ नृसिंह स्मरे आरंभा ।
हरीपाठ माहात्म्य अनंत लोभा । हरीपाठ वर्णीत श्रीविष्णुबाबा ।।१५।।

हरीपाठ हा सोडवि अंतकाळी । हरीपाठ हा रक्षि विपत्तीवेळी ।
हरीपाठ संतासि देई प्रचीत । हरीपाठ हा दावि जगासि नीत ।।१६।।

हरीपाठ स्वरूप सोळाचि श्लोकी । हरीपाठ तो हा विवेके विलोकी ।
हरीपाठ ये दृष्टि उभाचि राहे । हरीपाठ गाताचि विरोनि जाये ।।१७।।

हरीपाठ हा जीवनाचाचि योग । हरीपाठ भक्ती कृति ज्ञान चांग ।
हरीपाठ हा अक्षररूप आहे । हरीपाठ नामी हनूमंत होये ।।१८।।

हरीपाठ संकीर्तन श्रीहरीचे । हरीपाठ भजनामृत श्रीहरीचे ।
हरीपाठ हे संस्मरण प्रभूचे । हरीपाठ हे वैभव ज्ञानियाचे ।।१९।।

हरीपाठ साधी हरीपाठ साधी । हरीपाठ वेधी हरीपाठ वेधी ।
हरीपाठ बोधी हरीपाठ बोधी । हरीपाठ वंदी हरीपाठ वंदी ।।२०।।

हरीपाठ नामे हरीपाठ होतो [१] । हरीपाठ हरिचाची उद्‌घोष होतो [२]।
हरीपाठ हरितो वदनी रहातो । हरीपाठ हरीच्या चरणा पहातो ।।२१।।

हरीपाठ ही अक्षरे ज्या मुखासी । हरीपाठि या केवळ होय काशी ।
हरीपाठ हा जो करी पूजनाते । हरीपाठि तो वंद्य ही ब्रह्मयाते ।।२२।।

हरीपाठि तो श्रीहरीच्या पदासी । हरीपाठि तो दावितो श्रीहरीसी ।
हरीपाठि या श्रीहरी जीवनासी । हरीपाठि या श्रीहरिमाळ ऐसी ।।२३।।

हरीपाठ जैसा शिवपाठ तैसा । हरीपाठ स्फुरद्रूप शीवदासा ।
हरीपाठ जैसा गुरुपाठ तैसा । हरीपाठ स्फूर्तीच दासानुदासा ।।२४।।

हरीपाठ हा वोळला रामदासी । हरीपाठ स्फूर्ती पहा श्रीधरासी ।
हरीपाठ तो रामपाठासि आला । हरीपाठ हा सर्वगामी जहाला ।।२५।।

हरीपाठी गोविंद स्फूर्ती निघोट । हरीपाठ जैसा तसा रामपाठ।
हरीपाठ प्रेमे विवरीत राही । हरीपाठ गोविंदसुत राम गाई।।२६।।

---

१) पाठभेद :- होतो।

२) पाठभेद :- होतो।

हरीपाठ हा नाद कणाकणात। हरीपाठ संजीवन जीवनात ।
हरीपाठ हा वंदित दासराम । हरीपाठ योगेचि तया आराम ।।२७।।

हरीपाठ स्वरूप पहात राहे । हरीपाठ स्वरूप जाणोनि पाहे ।
हरीपाठ स्वरूप कानी असो हे । हरीपाठ स्वरूप चित्ती वसो ये ।।२८।।
(वही ७७, ८९, ९५, ,१११ ११६)

श्री माऊलीचे कृपे हे स्वरूप । गुरुलिंग रामी हनुमत्प्रदीप ।
कैवल्यपीठा आठवोनि चित्ती । पवनात्मजा अर्पीत राम प्रेमी ।।२९।।

**पाठभेद :–** श्री ज्ञानराजासी मनी नमोनी । गोविंद रघुनाथजी आठवोनी ।
हरीपाठ स्वरूप हा श्री गुरुलिंगरामा । हनुमत्पदी राम समर्पी प्रेमा ।।२९।।
(वही ८९)

## २) भावार्थ हरिपाठ / सुश्लोक हरिपाठ

देवाचिये द्वारी उभे रहाता । चारीही मुक्ति तया येती हाता ।
हरीमुखी जो हरिनाम गातो । संसारी या तोचि तो धन्य होतो ।।१।।

चौवेद षट्शास्त्र हरीसि गाती । पुराणे जयाची खरी भाट होती ।
मंथोनिया नाम घेती अनंता । वैकुंठ तो श्रीहरि भेटी संता ।।२।।

जेणे असे विश्व हे तेचि सार । हरीविना कोण तरे असार ।
चराचरी व्यापकता हरीची । अनंत जन्मोनि पुण्याई कैंची ।।३।।

निवांत होवोनि उगाचि राहे । येणे परी श्रीहरि तो दिसो ये ।
निशिदिनी कष्ट प्रपंच तोची । हरी जपे त्या न वार्ता तयाची ।।४।।

वाया उपाधि तरी दंभ धर्म । संदेह देहो निसंदेह राम ।
दृश्यासी या होतसे जेथ अंत । दृष्टांत तो माऊली सांगतात ।।५।।

नुरोनी उरे धन्य तो साधुबोध । जिथे वायूचा गंध ना तो सुगंध ।
विदेहीपणे जे समाप्तीच ठायी । हरिभक्त तो काय त्याची नवाई ।।६।।

परक्यापरी आत्मवस्तु जयाला । अभक्त तो मात्र जगी जहाला ।
ज्ञानाईसी एक आत्मा निधान । सर्वा घटी तोचि तो एक पूर्ण ।।७।।

संतांचिया संगती कोणी आला । मनाचिया मार्ग गती तयाला ।
पंथेची हा श्रीपती आकळे तो । भावे जीवाच्या हरिनामी येतो ।।८।।

मन ना जयाचे कधि रामकृष्णी । जपे व्यर्थ तो विष्णुविनाचि ज्ञानी ।
जन्मोनिया जो सदाचा करंटा । कही न येतो परि ऐक्य वाटा ।।९।।

त्रिवेणीचे संगमी या असोनी । नामाविना जो करि तीर्थ कोणी ।
नामी पराङ्मूख तो एक पापी । नामी जरी तो परमात्मरूपी ।।१०।।

उद्गामी उच्चार जो श्रीहरीचा । पापा नसे लेश कधी तयाचा ।
तया नसे पाहता भूतबाध। असे ज्ञानियांचा हरी तो अगाध ।।११।।

तीर्थी व्रती नेम भावेची सिद्धी । भावाविना एकची ते उपाधी ।
देहावरी ते स्वरूपानुभूती । निवृत्ती ते ज्ञानिया पूर्ण देती ।।१२।।

समत्वे सुखी श्रीहरीची समाधि । जेथे नुरे पाहता द्वैत बुद्धि ।
हरी[१] हरी हे चिंतन सर्वकाळ । समाधान ते पूर्ण बुद्धि विशाल ।।१३।।

खरे नित्य जे एक प्रमाणरूप । तेची असे श्रीहरिपाठरूप ।
कळीकाळही दृष्टि तया न पाहे । नारायणी वृत्ती जडोनि राहे ।।१४।।

एकत्व दावीतसे एक नाम । द्वैता आणी तेचि गा द्वैतनाम ।
समबुद्धि घेता तुळतो हरीसी । सहस्ररश्मीहि सूर्या प्रकाशी ।।१५।।

बुद्धी जपे श्रीहरी दुर्लभू तो । मनोन्मनी रामकृष्णीच येतो ।
सिद्धी नी बुद्धी हरिपाठी आले । प्रपंचीही साधुसंगे निमाले ।।१६।।

हरीपाठ कीर्ति हरिनाम वानी । पवित्र तो देह त्याचा निधानी ।
चतुर्भुजा विष्णुचि जीव होतो । निवृत्ति श्रीज्ञानिया ठाव देतो ।।१७।।

हरीवंश हे सत्य पुराण ज्यासी । हरीनाम संकीर्तन तेचि काशी ।
असे आवडी एकची रामकृष्णी । गोडी तया श्रीहरीरूप ध्यानी ।।१८।।

हरीवाचुनी जो घडे नेम धर्म । तया शीणची हेचि गा येथ वर्म ।
हरीपाठी जे येती होती निवांत । तयांची जगी धन्यचि एक मात ।।१९।।

अनंत जन्मोनि प्रकाशनाम । हरीपाठ हा मार्गची पूर्णकाम ।
या पाठीया जाती लया पसारे । ज्ञानाईसी साध्य नामीच सारे ।।२०।।

नसे काळ ना वेळ नामासी काही । घेता आणी ऐकता मुक्त होई ।
जीवा खरे तारण एक नाम । हरोनि दोषा करी पूर्णकाम ।।२१।।

जगी नित्य जे तोचि जयासी नेम । हरीनाम जिव्हे हरीचेचि नाम ।
हरीवाचुनी जन्म तो नर्क ज्यासी । का नाम ते गा गगनासी ग्रासी ।।२३।।

दृश्यासी या मेळ ज्याचे कलेने । असे नाम हे श्रेष्ठची त्या गुणाने ।
असा कोणता नेणवे आजपा रे । जयाचेनि हे धन्य जिणे खरे रे ।।२४।।

सर्वा घटी भाव जो शुद्ध राम । जेणेची या प्रक्रिया नेम धर्म ।
संदेह जाता धरिजेत भावो । सदा असो हा हरिकृष्णी टाहो ।।२५।।

हरीनामी या लुप्तची देहभावो । असे मोक्ष तोचि पहाता स्वभावो ।
वेदा कळेना कळे काय जीवा । नारायणी हा खलु मुक्तिठेवा ।।२६।।

मनासी धरी घट्टची नाम एक । श्रीरामकृष्णेसी गोविंद चोख ।
मौनेचिया माळ धरोनिया ही । होवोनिया सद्‌गद नाम राही ।।२७।।

लटिके टिकेनाची ऐसा प्रकार । संसारी या चालिली येरझार ।
हरीपाठ संजीवन ते समाधी । निवृत्ति ज्ञानेश अखंड साधी ।।२८।।

हरीपाठ अठ्ठावीस काय जाणा । प्रसन्न गाताचि तो ज्ञानराणा ।
संती कशी घेतली हे प्रचीत । जाणोनी वंदू[१] गुरु ज्ञाननाथ ।।२९।।

भावार्थ हरिपाठ ज्ञानेश बोली । स्फुरोनिया एथ वृत्ती निमाली ।
हनूमंत गोविंद पदी आराम । हरीपाठ गाई मनी दासराम[१] ।।३०।।

***

१ - पाठभेद :- हरीपाठ चिंतीतसे दासराम ।।३०।। (वही ८३)

२. पाठभेद - सदा ध्यास माझा गुरुलिंगनाथ (वही १०६)

# भाग ६ :– प्रकरण ग्रंथ

## १) मनाचे श्लोक –

नमू पार्वतीनंदन बुद्धिदाता । नमू या प्रतापी मना आदिमाता[१] ।
नमू सद्गुरु मोक्ष कैवल्यदाता । मना आक्रमू या पहा भक्तिपंथा ।।१।।

जगाचा नियंता खरा देव आहे । तेणे निर्मिले जीव आसंख्य पाहे ।
उपाधीमुळे दुःख हे भेद नाना। म्हणोनी निजध्यासी हो रामराणा ।।२।।

मना रे जरी होसी तू राम जाण । तयामाजी तूझे खरे हित जाण ।
नव्हे राजयोगे नव्हे भोगत्यागे । नव्हे रे कदापि स्वरूपा वियोगे ।।३।।

जहाला जरी भाग्यवंत कुळीचा । जरी घोळका घातला चाकरांचा ।
जरी राज्यलक्ष्मी घरी पातली रे । नव्हे रे नव्हे हीत ते सत्य बा रे ।।४।।

जरी मान्यता या जगी मेळविली । जरी स्वर्गसूखी तनू लोळवीली ।
जरी जाहला ज्ञानी बा मीपणे रे । नव्हे रे रव्हे हीत ते सत्य बा रे ।।५।।

नव्हे बा मना मोक्ष रे वक्तयासी । तयाचे हाती येतसे शब्दराशी ।
खरे हीत ते आत्मरूपी मिळावे । अखंडीत हे मानसी ध्यान ध्यावे ।।६।।

बळे ना कळे तर्क तो पांगुळेची।प्रयत्ने दिसेना प्रभा रे प्रभूची ।
प्रचीती तयाची पहा रामनामी। मना लक्षिता दीसते युक्ति नामी ।।७।।

खरी धन्यता जाणिजे रामनामी । खरा देव तो आकळे जाण प्रेमी ।
मना लक्षिता दीसते आत्मरूप । तया पाहता जातसे थोर ताप ।।८।।

मना आत्मरूपाची गेली स्मृती रे । म्हणोनी तुझी जाहली दुर्गती रे ।
जरी ध्यास घेसी तरी मुक्त होसी । खारी धन्यता लाहिजे नाम–सोसी ।।९।।

करोनी प्रयत्नासी रे अन्य राया । धरोनी मनी जाणिजे क्षुद्र काया ।
कसे सापडे जाणिजे मूळ रूप । देहेबुद्धीचे आलिया आड पाप ।।१०।।

असोनी जगज्जीवन जीव जाण । नसे त्याजलागी स्वसूख जाण ।
सुखाकारणे शोधितो अन्न जाण। तया मानवा बोलसी काय जाण ।।११।।

खरे सौख्य सोडुनी लागे (तनूसी) । पुन्हा येतसे तो पहा गर्भवासी ।
देहादिक हे मानुनी सौख्य जाण । उगा तडफडे सोडूनी राम जाण ।।१२।।

---

१. पाठभेद :– नमू आदिशक्ती प्रतापी जी माता ।

मना जीव तो अंशचि ब्रह्म जाण । परी पातला वो (नश्वरी) देही जाण ।
जहाला पहा तो कुडीरूप जाण । पहा भोगितो की महादुःख जाण ।।१३।।

जरी दीधले ज्ञान विशेष देही । निजध्यास आखंड तो देई ग्वाही ।
खरे सूख ते अंतरामाजी राही । परी दुःखची भोगी अज्ञानी पाही ।।१४।।

[१]असे ते कळेना कळोनी वळेना । वळोनी पहा प्रत्ययासी पडेना ।
असोनी सुलभ पहा नाम सोय । कसा जीव हा दवडी सुखमय ।।१५।।

असोनी पहा जीव हा पूर्ण काम । करी तो भ्रमे बापुडा दाम दाम ।
परी स्वप्न हे तो तयासी कळेना । खरे सौख्य ते नाढळे त्यास जाणा ।।१६।।

आम्ही जाण ब्रह्माहुनी नाही भिन्न । पहा सांगती सत्य हे साधूजन ।
तयाचेची इच्छे आम्ही येथ आलो । तरी वेगळे काय ते आम्ही झालो ।।१७।।

पहा विश्व हे जाहले कल्पनेचे । दिसे दो दिसांचे तसे सत्य साचे ।
आम्ही जाण द्रष्टेची मिथ्या जगाचे । मुळी पाहता ब्रह्मचि जाण साचे ।।१८।।

जरी वीसरले पहा मूळ रूप । अखेरीसी होती तरी माती रूप ।
सुखी असुनी दुःखी गुंतोनि जाती । असत्यावरी मानसी धरुनि प्रीती ।।१९।।

जसे बीज तैसे मना जाणी फळ । असा जाण सिद्धांत हा संत बोल ।
जरी जाणसी आपणासी मना रे । खरा धन्य सुदिन जाणी मना रे ।।२०।।

मना रामनाम ध्वनी अंतरात । कसा उमटे तालबद्ध स्वरात ।
तया ठाई होसी तदाकार जाण । तया मीळसी अर्पुनी जाण प्राण।।२१।।

निजध्यासी तू पाहिजे जीव जाण । गुरूचे कृपे जाणिजे वर्म खूण।
तरी या जगी होसी तू थोर जाण । मना आपुला ठाव घेई आपण ।।२२।।

कळेना कसा कोणता तो उपाय। म्हणोनी मना सेविजे गुरुराय ।
तयांचे कृपे होतसे सर्व काही । म्हणोनी गुरूलागी तू शरण जाई ।।२३।।

मना जाहल्या सद्गुरूची कृपा रे । कळे सत्य मिथ्या तुला जाण सारे ।
अति सुलभ होतसे पंथ बा रे । असे संतसाधू सदा सांगती रे ।।२४।।

जसा गुंतलासी तसा मुक्त होसी । शिवालागी तू एकदा मिळुनि जासी ।
तरी तूज नाही पुन्हा जन्म खेप । उरेना तया ठाई रे पुण्य पाप ।।२५।।

१. पाठभेद :- भ्रमे

करी हीत रे तू अती झडकरी । आहे जोवरी जाण आयुष्य दोरी ।
मना रे तू आता आत्मरूपी । नको दुःख सोसू पचू पापरूपी ।।२६।।

खरे आपुले हीत ते रामनाम । जगी थोर हे जाणिजे पुणकर्म ।
अशासारिखा थोर आचार नाही । खरे सौख्य ते लाभते याच देही ।।२७।।

असोनी निराळे भ्रमातीत जाण । तयाच्या गळे पातलो त्यात जाण ।
किती अघटित असे देवकरणी । जया वर्णिता शीणली वेदवाणी ।।२८।।

प्रभूची आहे दुर्घट जाण माया । आम्हा तारिजे तोची जाळ्यातुनि या ।
कसे गुंतले प्रेम सर्वा ठिकाणी । गोविते जाण आसंख्य प्राणी ।।२९।।

असे दुःख अंती परी हे कळेना । जिवा वाटते यातचि सौख्य जाणा ।
कधी तारिले वोखट्याने खऱ्यासी । परी घालिते भूल माया जीवासी ।।३०।।

जळाया (अविद्या) खऱ्याशी मिळाया । मना ध्याईजे रामची अंतरी या ।
जरी गुंतसी मीपणे या जगात । पुरेना तुझा जाणिजे सत्य हेत ।।३१।।

जरी भासले द्वंद्व बा रे तुला रे । तरी जाणिजे सर्वची वोखटे रे ।
तया नाही मोल परी दुःखमूळ । परब्रह्म ते सत्य जाणी विशाळ ।।३२।।

मना आपुले हीत साधी भल्या रे । खरे हीत ते रामनामी बरे रे ।
मना द्वैत जेथे खरे दुःखा तेथे । परी हीत होई जनी भक्तिपंथे ।।३३।।

कळो येतसे रे विचारे पहाता । प्रभूची जगी जाणवे जाण सत्ता ।
खरा देव तो एकला अन्नदाता । मना रे जगा पाळीता जाण आता ।।३४।।

मना आत्मज्योती कळे नाम गाई । तेणे उन्मन मन रे जाण होई ।
मनोन्मन होता प्रभा ते प्रकाशे । मना दावी जो रे तया आनयासे ।।३५।।

(वही ३८, ११२)

❋

## २) कैवल्यसुमन

बोधी श्रीकृष्ण पार्थासी नामगीता ही अंतरी ।
गीतासारचि हे स्तोत्र अष्टश्लोकी पहा तरी ।।१।।

"सततं कीर्तयंतो मां" यावरी ज्ञानराजही ।
नामपाठचि गीतेचे कीर्तनी सार दाविती ।।२।।

हनुमत् प्रभु संपादी स्वसंग्रही अमोलिक ।
नेमेचि पठती जे का ते जगी थोर साधक ।।३।।

सर्व ग्रंथातुनी नाम एक गोविंद घेतसे ।
भगवद्गीता नामगीता कीर्तनी घोष होतसे ।।४।।

कैवल्याविधि या ग्रंथी रघुनाथ प्रकाशी जे ।
कैवल्यपद जे देई गीता कैवल्य बोलिजे ।।५।।

गीतेमाजी नामयोग असे गोविंद बोलला ।
पाहता स्तोत्र हे ऐसे सत्यचि लाधले मना ।।६।।

श्रीकृष्ण अर्जुना जैसा श्रीराम वायुनंदना ।
गीतेचे सार हे नाम सापडे का गुरुबिना ।।७।।

गुरुलिंगमहाराजे बोधिती जे आवर्जुनी ।
महात्मे जे खरे झाले थोर परमार्थ साधनी।।८।।

कुंतीसुतासि श्रीकृष्णे वोपिले सार नाम जे ।
हनुमंत प्रभूनी ते पद्यात गुंफिले असे ।।९।।

सूचना पांडुरंगाची कैवल्य सुमने भली ।
दासरामा मनी राहे हनुमत् गुरु माऊली ।।१०।।

श्रीकृष्ण गोविंद हरी मुरारी श्रीनाथ नारायण वासुदेव ।
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ मुकुंद विष्णू भगवन् नमूया।।११।।

नाना शास्त्र जया हाती नानादैवत पूजिती ।
आत्मज्ञानाविना पार्थ सर्व कर्म निरर्थक ।।१२।।

सोडोनि माझिया नामा आचरी सर्व कर्मही ।
त्याचे कर्मचि तो बंध सुख नाही कदापि ही ।।१३।।

स्मरविणे (स्मरणे?) माझिया नामा सांडोनी सर्व कर्मही ।
माझे प्रिय ऋषी जें का कर्म ते करिती मेदिनी ।।१४।।

विसरोनी माझिया नामा सारे जे कर्म साधिती ।
कर्मफल नसे त्याते नाही आश्चर्य अर्जुना ।।१५।।

म्हणोनी अर्जुना नामा भजे का दृढ मानसी ।
माते प्रियची तो नामी परी कर्मी तसा नसे ।।१६।।

निर्विकल्प मने जे का गाती जे नाम मानव ।
माझा वास तये ठायी यापरी काय ते प्रिय ।।१७।।

योगावस्थित श्रीकृष्ण जिथे पार्थ धनुर्धर ।
तिथेचि माझिया बुद्धी नित्य श्री जय वैभव ।।१८।।

गुरुलिंग महाराजा आठवोनी मनी स्वये ।
[१] कैवल्यसुमना प्रेमे दासराम समर्पितो ।।१९।।

(वही १०५)

✻

## (३) परमार्थ सार –

नमू पार्वतीनंदनू बुद्धिदाता । नमू आदिशक्ती प्रतापी जी माता ।
नमू सद्गुरु मोक्षकैवल्यदाता । मना आक्रमू या पहा भक्तिपंथा ।।१।।

जगाचा नियंता खरा देव आहे । तेणे निर्मिले जीव आसंख्य पाहे ।
उपाधीमुळे दुःख हे भेद नाना । म्हणोनी निजध्यासी हो रामराणा ।।२।।

प्रभू थोर कर्ता असे या जगाचा । न वर्णू शके ही पहा वेदवाचा ।
दयाळू कृपाळू असे जो मनाचा । मना घेईजे सोस या राघवाचा ।।३।।

तयाचे पुढे कोण सामर्थ्य राहे । तया भक्तया वाकडे कोण पाहे ।
भजे जो तया तो पहा सौख्य लाहे । अहंकारी तो नरकची भोगिताहे ।।४।।

मना नेतसे बा अहंभाव ज्ञान । चुकेना अहंकारिया फेर जाण ।
सुटेना तयाचे महद् दुःख जाण । खरे सौख्य ते जाईजे दूर जाण ।।५।।

तयाचेनि सत्ते लवे नेत्रपाती । तयाचेनि येई तनूमाजी शक्ती ।
तयाचेनि योगे घडे सर्व काही ।तयाचे विना पाहता काय (काही) नाही ।।६।।

पहा मानवा देणगी बुद्धी त्याची । तयाचे वियोगे घडे सर्व ची ची ।
तयाचे कृपे धन्यता प्राप्त होय । त्यजोनी अहंभाव घे ज्ञान सोय ।।७।।

कसा चक्षु हा पाहतो सर्व काही । कसे सौख्य दुःख गमे जाण देही ।
तयाचे विणे जाण आराम नाही । म्हणोनी मना लागी तू रामपायी ।।८।।

---

१ पाठभेद :–सूचना पांडुरंगाची समश्लोकी ही गुंफिली ।
दासरामा मनी राहे हनुमन् गुरू माऊली ।। (वही १०५)

तयाचेनि सत्ते करी कामधंदा । तयाचेनि योगे कळे बुद्धिमंदा ।
तयाचेनि सत्ते चळे देह तूझा ।असा देव तो सर्वराजाधिराजा ।।९।।

कशी चामडी सांगते कठिण मृदू । कसा ऐकतो कर्ण आसंख्य नादू ।
कशी वाणी बोले मना जाण पाही । मना कारणू शक्ति देवाचि पाही ।।१०।।

मना पोषितो एकला या जगासी । मना व्यापिला अंतरी हृषीकेशी ।
जसा बुडबुडा येतसे रे समुद्री । तसे सत्स्वरूपी जग त्याच परी ।।११।।

तरूंना कसे जीवन देई कोण । कसे बालका दुग्ध हे देई जाण ।
न हाले तयावीण हे वृक्षपान । प्रभूची लिला थोर आतर्क्य जाण ।।१२।।

कसा नाचवीतो जगालाही पाही । कसे गोविले सूत्र या जाण देही ।
तयालागी जाणोनि राही मना रे । जगामाजी होई भला रे भला रे ।।१३।।

तयाचेनि सत्ते तपे सूर्य जाण । तया भीतीने बा वहे वायु जाण ।
तया इच्छया आतपे अग्नि जाण । महा इंद्र तो वंदितो त्यासी जाण ।।१४।।

जेणे निर्मिले विश्व आपार जाण । तयालागी घेई बरा ओळखून ।
मुखी नाम घेता कळे रूप जाण । रुपी राहता मुक्तची होसी जाण ।।१५।।

जगाचे अधारे पहा विश्व ठेले । जयाचेनि त्या रूप हे प्राप्त झाले ।
जयाचे मुळे कर्म हे प्राप्त होय । अशा राघवा तू मना शरण जाय ।।१६।।

जयाचेनि तेजे रवी तप्त झाला । जयाचेनि रसत्व येई जळाला ।
जयाचेनि हे पोकळी प्राप्त झाली । असा देव तो जाणिजे नाम-बोली ।।१७।।

तुटेना फुटेना जळेना विझेना । तरेना बुडेना कदा देवराणा ।
दिसेना तरी राहता द्वैतभाव । जगी आद्वयो जाणिजे रामदेव ।।१८।।

तये ठाई जाता नसे सूखदुःख । पहा आत्मरूपी नसे तहानभूक ।
नसे पुण्यपाप नसे त्रिविध ताप । तुटे बंधन द्वैत हे आपेआप ।।१९।।

तेणे निर्मिले सर्व विश्वासी पाही । तया निर्मिता पाहता कोणी नाही ।
पहाता असत्याशी बा जन्म आहे । जरी कल्पना होय सत्यात पाहे ।।२०।।

पहा विष्णुरूपे करी पोषणू रे । मना पोषिता येतसे जे अकारे ।
तसा सत्यरूपी नसे राम काही । तया पोषिता पाळिता कोणी नाही ।।२१।।

मना थोर हे सत्य की जाण राया । तेणे निर्मिली थोर ही जाण माया ।
तया नाही मृत्यू अजन्माचि जाण । अनंतु अपारू महा गूढ जाण ।।२२।।

तया तर्कता तर्कता तर्कवेना । तया शक्तिने जाणता जाणवेना ।
जरी मीपणा जाळिला अंतरीचा । तरी शोध लागे रघूनायकाचा ।।२३।।

जरी निर्मिता जाण ब्रह्मा जगाचा । तया कोण निर्मे करी शोध त्याचा ।
जरी पाळिता विष्णू बा या जगासी । तरी पाळितो कोण बा जाण त्यासी ।।२४।।

हरी या जगासी जरी शीवराय। हरी जो तया त्या मना शरण जाय ।
जरी मृत्यू नेई मना या जगासी । तया राम नेई मना जाण त्यासी ।।२५।।

अमर्याद जे निर्गुणी निश्चळू रे । सदानंदरूपी मना जाण ते रे ।
तया पाहता मीपणा ठाव नूरे । मना होई रे तद्रूपी जाण बा रे ।।२६।।

मना चेतना निर्मिली त्यापासोनी । मना तत्त्वता जीव हा चक्रपाणी ।
तयेपासुनी पातला जाण देही । भ्रमे दुःखी झाला असे जाण पाही ।।२७।।
(वही १५)

**– परमार्थसार समाप्त –**

***

# संदर्भ-सूचि

(अ) दासराममहाराजांच्या हस्तलिखित वह्या

१, १४, १५, २०, २१, २२, २८, ३८, ४२, ५०, ६८, ७७, ७९, ८०, ८३, ८९, ९५, १०२, १०३, १०५, १०६, १११, ११५, ११६, १२४, १३४, १३६, १४७, १५८

(आ) ग्रंथ

१) अमृत वाणी, प्र. रा.गो.केळकर, सांगली, १९८१

२) कैवल्यप्रसाद, प्र. ह.र.कोटणीस व पां.र.कोटणीस, सांगली, १९५९

३) श्रीदासराम गौरव ग्रंथ, प्र. धनंजय भावे, सांगली,१९८०

४) नमनस्तोत्र, दासराममहाराज, सांगली, प्रथम आवृत्ती, १७७२

५) नागाप्पाण्णा महाराज निंबरगीकर चरित्र, दासराम, सांगली,(प्रकाशनवर्ष दिलेले नाही)

६) नीलकंठभारती चरित्र, श्याम पवार, अंबवडे (विठ्ठलवाडी), प्रथमावृत्ती, १९८८

७) महानिर्वाण, प्रकाश भावे, सांगली, १९८४

८) राधाबाई अक्का यांचे चरित्र, दासराम, सांगली, (प्रकाशन वर्ष दिलेले नाही)

९) रामपाठ, गो.अ.केळकर, सांगली.

१०) साधुमहाराजांची चिन्मय यशोगाथा, के.वा.आपटे, सांगली, १९७९

११) साप्ताहिक तुतारी, प.पू.रामराय केळकर महाराज विशेषांक, सांगली, १९८७

१२) सांगली माहात्म्य, दासराम, सांगली, १९८८

१३) सिद्धस्तुति, दासराम, सांगली, १९७७

***

५२

# प्रा.डॉ.के.वा.आपटे : अल्प परिचय

**पूर्ण नाव :–** केशव वामन आपटे. जन्मस्थळ व दिनांक :– सांगली ९/९/१९२९. **शिक्षण :–** सांगली म्युनिसिपल मराठी शाळा नं २ (सध्याचे मामामहाराज केळकर विद्यालय); पी.एम.हायस्कूल (सध्याचे गणपतराव आरवाडे हायस्कूल); विलिंग्डन महाविद्यालय. **परीक्षा, प्रावीण्य,पारितोषिके,शिष्यवृत्त्या** (१) मॅट्रीक परीक्षेत (मुंबई विद्यापीठ,१९४७) डिस्टिंक्शन आणि अकबरनवीस संस्कृत शिष्यवृत्ती. (२) इंट्र आर्ट्स परीक्षेत (पुणे विद्यापीठ १९४९), लोकमान्य टिळक संस्कृत शिष्यवृत्ति. (३) बी.ए. (संस्कृत ऑनर्स परीक्षेत)(पुणे विद्यापीठ १९५१, प्रथम वर्ग)(४) एम.ए. (संस्कृत व अर्धमागधी हे विषय) परीक्षेत (पुणे विद्यापीठ १९५३) प्रथम वर्ग आणि बी.डी.नातू वेदांत पारितोषिक. (५) पी.एच.डी. (विषय :– ब्रह्मसूत्रातील बौद्ध व जैन मतांचे खंडन) (मुंबई विद्यापीठ १९६४) **अध्यापन :–** कीर्ति कॉलेज, मुंबई आणि विलिंग्डन कॉलेज, सांगली यांमधे १९५४–१९८९ पर्यंत संस्कृत व अर्धमागधी (प्राकृत) या विषयांचे अध्यापन. एम्.फिल् आणि पी.एच.डी. या संशोधनासाठी मार्गदर्शक म्हणून शिवाजी विद्यापीठाची मान्यता. **स्वतंत्र पारितोषिके :–** १) भारतीय तत्वज्ञानातील आत्मसाक्षात्काराचे मार्ग या इंग्रजीतील प्रबंधासाठी बनारस हिंदू विद्यापीठाचे बूच मेटॅफिझीक्स पारितोषिक. २) मूळगीता व तिचा वक्ता या इंग्रजीतील निबंधासाठी प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरी विश्वविद्यालयाचे पारितोषिक ३) आत्मानात्मविवेक या शंकराचार्यांच्या ग्रंथासाठी भारत सरकारची शास्त्रचूडामणि या योजनेखालील शिष्यवृत्ती. **पुरस्कार:**–१) पाठक स्मृती प्रतिष्ठान (नागपूर) २) सांगली नगरवाचनालय (सांगली) यांचे पुरस्कार ३) खोचीकर गौरव पुरस्कार ४) प्रतिष्ठा प्रतिष्ठान (सांगली) पुरस्कार ५) ना.ह.आपटे (कोरेगाव) पुरस्कार ६) मातृमंदिर विश्वस्त संस्था(निगडी – पुणे) यांचे दोन पुरस्कार. ७) सद्गुरू नारायणानंदतीर्थस्वामी सेवा ट्रस्ट (क्षेत्र औदुंबर) यांचा करवीरपीठाधिपती जगद्गुरू शंकराचार्य यांचे शुभ पवित्र हस्ते शास्त्रभूषण पुरस्कार **लेखन :–** संस्कृत,इंग्रजी,हिंदी व मराठी या चार भाषात लेखन. **लेखनाचे विषय :–** उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, भगवद्गीता, शंकराचार्यांचे प्रकरण ग्रंथ, रामानुजाचार्यांचे ब्रह्मसूत्रावरील श्रीभाष्य, मध्वाचार्य कृत खंडनत्रय, सांख्यकारिकेवरील गौडपाद भाष्य, बौद्ध आणि जैन दर्शन, विद्यारण्यकृत पंचदशी, रामायणे (वाल्मीकी, आनंद, अद्भुत, अध्यात्म), कालिदासाची नाटके व कुमार संभव, भासाचे स्वप्नवासवदत्त, प्राकृत भाषा आणि मराठी भाषा, संस्कृत व प्राकृत या भाषांची व्याकरणे, ज्ञानेश्वरांचे अभंग व अमृतानुभव, समर्थ रामदासस्वामीच्या दासबोधातील तत्त्वज्ञान, दासराममहाराज केळकर यांचे ग्रंथ यावरील लेखन स्वतंत्रपणे प्रकाशित आणि ५५ पेक्षा अधिक नियतकालिकात प्रकाशित. **प्रकाशित ग्रंथ :–** संस्कृतमधील दोन स्वतंत्र ग्रंथ, भाषांतरीत ५ ग्रंथ संपादित, ४ ग्रंथ प्रस्तावनेसह ५ ग्रंथ संपादित. प्रस्तावना, भाषांतर व टीपा यासह ७ ग्रंथ, ३ स्वतंत्र ग्रंथ, ८ संत चरित्रे आणि भगवद्गीतेवरील ५ ग्रंथ. **अध्यात्म :–** दासराममहाराज केळकर यांचा अनुग्रह, आध्यात्मिक ग्रंथाचे वाचन आणि लेखन **यात्रा :–** दासरामहाराजांच्या अनुमतीने सांप्रदायिक स्थाने चिमड आणि निंबरगी आणि भारतातील उज्जयिनी, काशी, प्रयाग, रामेश्वर, कन्याकुमारी, गोकर्णमहाबळेश्वर इ. तीर्थक्षेत्रांच्या सहकुटुंब यात्रा. **देणग्या :–** कोल्हापूरची महालक्ष्मी आणि गुहागर येथील व्याडेश्वर यांना आर्थिक देणग्या तसेच अनेक शैक्षणिक संस्था, सामाजिक आणि धार्मिक संस्था यांना पुस्तकरूपाने आणि द्रव्यरूपाने देणग्या. **आकाशवाणी :–** मुंबई आणि सांगली आकाशवाणीवर कार्यक्रम. **संदर्भ ग्रंथात नोंदी :–** दिव्य ज्योति (संस्कृतमध्ये), लर्नेड इंडिया आणि रेफरन्स इंडिया (इंग्रजीमध्ये) आणि मराठी सारस्वत(मराठीमध्ये) या संदर्भ ग्रंथांत नावाची नोंद आणि संक्षिप्त माहिती.

## प्रा.डॉ.के.वा.आपटे यांचे प्रकाशित ग्रंथ

### – संस्कृत –

| | |
|---|---|
| १) श्रीगरुलिंगगीतम् (सांगली) | १९९० |
| २) श्रीदासरामगीतम् (सांगली) | १९९१ |

### – हिंदी –

| | |
|---|---|
| ३) त्रिविक्रमकृत प्राकृत शब्दानुशासन (सोलापुर) | १९७३ |
| ४) श्रीहेमचंद्रकृत प्राकृत व्याकरण (प्रस्तावना,भाषांतर व टीपा यांसह) (बनारस) | १९९६ |

### – मराठीत फक्त भाषांतर –

| | |
|---|---|
| ५) कालिदासकृत विक्रमोर्वशीय नाटक (मुंबई) | १९५९ |
| ६) नासदीय सूक्त (सांगली) | १९८८ |
| ७) भगवद्गीता तत्त्वविवेचिनी टीका (गोरखपूर) | २००० |
| ८) प्रेमदर्शन (देवर्षि नारद-विरचित भक्तिसूत्र) (गोरखपूर) | २००४ |
| ९) अध्यात्मरामायण (गोरखपूर) | २००४ |
| (७ ते ९ डॉ. गो. रा. कुलकर्णी यांसह) | |

### – संपादित –

| | |
|---|---|
| १०) परमार्थ प्रकाश अर्थात श्रीदासराम वचनामृत (सांगली) | १९८७ |
| ११) रेणुकामाहात्म्य (सांगली) | (सन छापलेला नाही) |
| १२) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र आणि अन्य लघु ग्रंथ (सांगली) | १९९७ |
| १३) श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह (सांगली) | २००८ |

### – प्रस्तावनेसह संपादित –

| | |
|---|---|
| १४) परमार्थसार आणि अन्य ग्रंथ (सांगली) | २००२ |
| १५) श्रीदासराममहाराजकृत आरतीसंग्रह (सांगली) | २००२ |
| १६) चांगदेवपासष्टी आणि इतर ग्रंथ (सांगली) | २००२ |
| १७) परमार्थ प्रश्नोत्तरी (१ली व २री आवृत्ती) (सांगली) | २००२ |
| १८) श्रीदासराममहाराजप्रणीत भजनतरंग (सांगली) | २००६ |
| १९) श्रीदासराममहाराज आत्मचरित्र (सांगली) | २०१० |
| २०) परमार्थ प्रश्नोत्तरी (३री आवृत्ती) (सांगली) | २०१० |

## – स्वतंत्र –

२१) श्रीगुरुतृतीया कथा (मुंबई) १९६०
२२) चिमड संप्रदाय (सांगली) २००५
२३) दासबोधातील तत्त्वज्ञान (सांगली) २००७

## – संतचरित्रे –

२४) रघुनाथप्रिय साधुमहाराज यांची यशोगाथा (सांगली) १९७९
२५) निंबरगीकरमहाराज (पुणे) १९८३
२६) चिमडमहाराज (पुणे) १९८४
२७) महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का (पुणे) १९८६
२८) श्रीदासराम जीवन विहंगम दर्शन (श्री दासराम – गौरव – गीत) (सांगली) १९९९
२९) श्रीदासराममहाराज चरितामृत (सांगली) २००३
३०) श्री दासराममहाराजांचे नित्य – पाठ – चरित्र (१ली आवृत्ती) (सांगली) २००७
३१) श्री दासराममहाराजांचे नित्य – पाठ – चरित्र (२री आवृत्ती) (सांगली) २००८
३२) श्री रघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे चरित्र (सांगली) २००९
३३) श्री नारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र (सांगली) २०१०

## – प्रस्तावना, भाषांतर व टीपा यांसह संपादित –

३४) हेमचंद्रकृत अपभ्रंश व्याकरण (मुंबई) १९६३
३५) ब्रह्मसूत्र शांकरभाष्य चतु:सूत्री (पुणे) १९७३
३६) वररुचिकृत प्राकृत व्याकरण (मुंबई) १९८७
३७) जगद्गुरु आद्य शंकराचार्य – प्रणीत आत्मानात्मविवेक (सांगली) २००१
३८) न्यायावतार (पुणे) (जैन दर्शनावरील) २००१
३९) नयकर्णिका (मुंबई) (जैन दर्शनावरील) २००१
४०) आद्य शंकराचार्यकृत तत्त्वोपदेश (सांगली) २००३
४१) शंकराचार्यकृत शतश्लोकी (मुंबई) २००९

## – भगवद्गीतेवरील –

४२) गीतेतील तीन पदे (पुणे) १९९०
४३) पाठांतर सुलभ भगवद्गीता (सांगली) २००३
४४) श्रीमद्भगवद्गीता (संपूर्ण मराठीतून) (सांगली)
(प्रस्तावना, भाषांतर व टीपा यांसह) २००४
४५) भगवद्गीता ( लेखसंग्रह) (सांगली) २००५
४६) श्रीमद् भगवद्गीता (निवडक श्लोकांवरील लेख) (सांगली) २००८

✻✻✻

# श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र.................. १९४०

२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी, सानंद टीकेसह, व तात्पर्यार्थसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ....... १९५२

३) श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार........ १९६८

४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ)............ १९६९

५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह......... १९७१

६) श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह.......................... १९७२

७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत......................... १९७३

८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र................. (सन दिलेला नाही)

९) श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह) .... १९७४

१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र..................................................... १९७५

११) सिद्धस्तुती......................................................... १९७७

१२) अमृतानुभव - मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह..................... १९७९

१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र.................................. १९८३

१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र................................ (सन नाही)

१५) गुरुपाठ................................................................ १९८४

१६) सांप्रदायबोध......................................................... १९८४

१७) श्रीरामपाठामृत...................................................... १९८४

१८) बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र...................................... १९८४

# श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा


१९) श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र............................. १९८७

२०) नित्यपाठामृत....................................................... १९८७

२१) संजीवनपाठ........................................................ १९८७

२२) श्रीदासरामवचनामृत................................................. १९८७

२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति....................................... १९८८

२४) श्रीगोविंददर्शन...................................................... १९८८

२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत...................... १९८८

२६) श्रीदासरामगाथा..................................................... १९८८

२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण....................... १९८९

२८) श्रीगुरुमहिमा........................................................ १९९१

२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ.................................... १९९७

३०) श्रीरामदासबोध..................................................... १९९७

३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला.................................... १९९९

३२) परमार्थासार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह) २००२

३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पाहिली व दुसरी........................... २००२

३४) आरती संग्रह........................................................ २००२

३५) चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ.......................................... २००२

३६) हरिपाठ संकीर्तन..................................................... २००७